## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३४ बुधवार, दि. ०९ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### आतापर्यंत देशात २५४ मिमी पाऊस, १५% जास्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली /भोपाळ :** नैऋत्य मोसमी वारे देशभरात मुसळधार पाऊस पाडत आहेत. आतापर्यंत मान्सून हंगामात सामान्यपेक्षा १५% जास्त पाऊस पडला आहे. या वेळेपर्यंत २२१.६ मिमी पाऊस पडणे अपेक्षित होते, परंतु २५४ मिमी आधीच पडला आहे. मध्य प्रदेशात सततच्या पावसामुळे बालाघाट, मांडला, सिवनी, इटारसी आणि कटनीसह अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. अनुपपूरमध्ये पूल कोसळल्याने एक कार वाहून गेली. यामध्ये पती-पत्नी आणि २ मुलांचा मृत्यू झाला. हिमाचल प्रदेशात गेल्या ६ दिवसांत मुसळधार पावसामुळे १४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर २८ जण बेपत्ता आहेत. तथापि, आता हवामान सामान्य झाले आहे.

### आज २५ कोटी कामगार संपावर जाणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** आज अनेक राज्यांमध्ये बँका, विमा, पोस्ट, कोळसा खाणकाम, महामार्ग, बांधकाम आणि सरकारी वाहतूक यासारख्या महत्त्वाच्या सेवांवर परिणाम होऊ शकतो. कारण १० केंद्रीय कामगार संघटना आणि त्यांच्या संलग्न संघटनांचा दावा आहे की २५ कोटींहून अधिक कर्मचारी उद्या देशव्यापी संपावर असतील.
हा संप संस्थांच्या खासगीकरणाविरुद्ध आणि चार नवीन कामगार संहितांच्या विरोधात आहे. त्याचा उद्देश केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करणे आहे, ज्यांना संघटना कामगारविरोधी, शेतकरीविरोधी आणि कॉर्पोरेट समर्थक मानतात.

### हिंजवडी आयटी पार्कसाठी नोडल अधिकाऱ्याची गरज:खा. सुळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** बारामती लोकसभा मतदार संघातील मुळशी तालुक्यातील हिंजवडी येथील राजीव गांधी आयटी पार्क हे जागतिक दर्जाचे केंद्र असून त्यादृष्टीने येथे उत्तम सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. हिंजवडी, राजीव गांधी आयटी पार्क, माण, मारुंजी आदी परिसरामध्ये नागरिकांना ट्रॅफिक, रस्ते, वीज, पाणी तुंबणे या सारख्या समस्यांना समोरे जावे लागत आहे. या भागातील पायाभूत सुविधांच्या बाबतीत येणाऱ्या अडचणींवर लवकर मार्ग निघत नाही. यासाठी नागरीकांना एम आयडीसी, महापालिका, मेट्रो, पीएमआरडीए, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस खाते आदी आस्थापनांकडे मोठा पाठपुरावा करावा लागतो. या शासकीय आस्थापनांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने यामध्ये नागरीकांचा वेळ जातो.




# मुख्यमंत्र्यांकडून सरन्यायाधीशांच्या कार्याचे कौतुक

## भूषण गवई यांनी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांवर फडणवीसांचे गौरवोद्गार

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळातर्फे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी भूषण गवई यांनी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयावर भाष्य केले.**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आजचा हा क्षण अतिशय आनंदाचा आहे, महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई हे भारताचे सरन्यायाधीश झाले. त्यामुळे आपल्या विधिमंडळाने निर्णय घेतला की, त्यांचा सत्कार करावा. विधिमंडळातर्फे म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेकडून सत्कार आहे. त्यांच्यातील साधेपणा असा की मी अध्यक्षांना विचारले की तुम्ही जाऊन गवई साहेबांना निमंत्रित केले की नाही? त्यावेळेस अध्यक्षांनी सांगितले की, गवई साहेबांना निमंत्रण देण्यासाठी कॉल केला, तेव्हा गवई साहेबांनी सांगितले की, तुमचे निमंत्रण मला मिळाले असे समजा. फॉरमॅलिटीची आवश्यकता नाही. मला असे वाटते की त्यांच्यामध्ये हा जो काही साधेपणा आहे, आपल्यापैकी अनेकांचा संबंध त्यांचे वडील दादासाहेब गवई यांच्याशी आलेला असेल. दादासाहेब गवई हे प्रचंड बुद्धिमत्ता असलेले व सर्वांशी अतिशय चांगले संबंध असलेले असे दादासाहेब होते. तोच गुण हा गवई साहेबांनी घेतला आहे. सरन्यायाधीश आहेत, पण ते कधी कोशात गेले नाहीत.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, या सभागृहात २५ टक्के लोक असे आहेत ज्यांना सरन्यायाधीश अगदी जवळून ओळखतात. ते जेव्हा वकील होते तेव्हा नागपूरच्या झोपडपट्ट्यांचा मोठा प्रॉब्लेम झालेला होता, तोडून टाकण्यात आल्या होत्या. विलासराव देशमुख हे त्यावेळी मुख्यमंत्री होते. विलासराव देशमुखांनी तोडगा काढण्यासाठी तातडीने बैठक बोलावली, त्यात गवई साहेबांना बोलावण्यात आले होते. सरकारी वकील म्हणून गवई यांनी योग्य भूमिका मांडली व त्यावर स्थगिती आणली. तेव्हापासून मी पाहतो की मानवता आणि संवेदनशीलता हा त्यांच्यातील गुण आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी आनंदाचा आहे. आपल्या परिवारातील एक व्यक्ती देशाच्या सर्वोच्च स्थानावर बसली. भूषण गवई यांनी १४ मे रोजी शपथ घेतली. कायद्याच्या चौकटीत राहून त्यांनी काम केले. देशाला एक अस्सल हिरा मिळालाय. एवढ्या मोठ्या पदावर असून देखील त्यांच्यात एक शालिनता पहायला मिळाली. सर्वोच्च पदावर असूनही जमिनीवर पाय असलेले असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आपल्या सेंटर हॉलमध्ये अनेक सत्कार झाले, पण आजच्या सत्काराची विधिमंडळामध्ये नोंद होणार आहे. आजच्या भाषणाची सुरुवात माय लॉर्ड अशी करायला हवी होती. लोकशाहीला अधिक बळकट करणारी अशी व्यवस्था आहे. लोकशाही व्यवस्थेत सर्वात मोठी जबाबदारी ही सरन्यायाधीश यांची असते. ही जबाबदारी आता भूषण गवई सांभाळत आहेत.

> महाराष्ट्रासाठी आणखी एक महत्त्वाचा निर्णय गवई यांनी दिला तो म्हणजे झुडपी जंगलाचा. आम्ही लहान होतो तेव्हापासून कुठलाही विदर्भातील पुढारी हा एकच मागणी करायचा की झुडपी जंगलाचे काहीतरी करा. त्यामुळे अनेक काम रखडली होती. परंतु, यावर गवई साहेबांनी खूप मोठा आणि महत्त्वाचा निर्णय यावर दिला.
>
> **– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

अंबादास दानवे यांनी म्हटले की, भूषण गवई यांचा आपण सत्कार करतोय. दोन्ही सभागृहाचा मी एकटाच विरोधी पक्ष नेता आहे. काल परवा कुणी तरी मराठी बद्दल बोललं पण दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा हे भूषण गवई यांनी दाखवून दिले आहे. मराठवाडा आणि विदर्भातली माती काही वेगळी नाही. भूषण गवई आपल्या देशाचे सरन्यायाधीश झालेत. भूषण गवई यांनी प्राथमिक शिक्षण मराठी भाषेत घेतले. मराठी भाषेत शिक्षण घेतलेला व्यक्ती देखील देशाच्या सर्वोच पदावर जाऊ शकतो हे भूषण गवई यांनी दाखवून दिले आहे.

## मंत्री राधाकृष्ण विखेंकडून सरन्यायाधीश गवईंचा सन्मान



मुंबई येथील महाराष्ट्र विधिमंडळामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांची महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट घेवून चर्चा केली. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी सरन्यायाधीश गवई यांचा सत्कार केला.

# .. आता ६८,००० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा मिळणार लाभ

## जलसंपदा मंत्री विखे पाटील; निळवंडेच्या उर्वरीत कामांसाठी ५ हजार कोटी मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** जिल्ह्यातील जिरायती भागाला वरदान ठरलेल्या निळवंडे (ऊर्ध्व प्रवरा) प्रकल्पाच्या उर्वरीत कामांकारीता केंद्र शासनाच्या केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीने ५ हजार २३ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीची १५९ वी बैठक केंद्रीय जलसंसाधन मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत निळवंडे प्रकल्पाच्या उर्वरीत कामांसाठी निधी उपलब्ध होण्याकरीता केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीची मान्यता मिळणे गरजेचे होते.

> विशेषत: लाभक्षेत्रातील शेवटच्या गावाला पाणी देण्याच्या दृष्टीने विभागाने सर्व नियोजन केले असून, यापुर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या माध्यमातून महायुती सरकारने निळवंडेच्या कामास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने केलेल्या सहकार्यामुळे लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्यांना पाणी मिळाले आहे.
>
> **– राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री**

या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, राहाता, कोपरगाव, राहुरी तालुक्यातील आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील एकूण ६८ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यासाठी व्यक्तिगत पाठपुरावा केला होता.

केंद्रीय समितीच्या मान्यतेमुळे निळवंडे प्रकल्पास केंद्र सरकार कडूनही निधी उपलब्धतेचा मार्ग मोकळा आहे. सुमारे ५ हजार २३ रूपयांच्या निधीस मान्यता मिळाल्याने कालव्याच्या उर्वरित कामांना निधी उपलब्ध होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.



सन १९७० मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, प्रकल्पाचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पामध्ये निळवंडे धरण, ७० किलो मीटर लांबीचा उजवा कालवा आणि ८५ किलो मीटर लांबीचा डावा कालवा असून वर्षाला १०.५ टीएमसी पाण्याचा वापर होणार आहे.

# कामगारांच्या विकासासाठी महायुती शासन कटिबद्ध

## आ. आशुतोष काळे; नोंदणीकृत बांधकाम कामगारांना साहित्य वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** शासनाच्या योजना पात्र नागरीकांच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी वेळोवेळी स्वत:ची यंत्रणा उभी करून आजवर शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ गरजू व पात्र लाभार्थ्यांना मिळवून दिला असून शासनाच्या योजना केवळ कागदावरच न राहता ह्या योजना प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हेच ध्येय आहे. यापुढील काळातही त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि विकासासाठी महायुती शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले. कोपरगाव शहरातील



> समाजातील अनेक कष्टकरी शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात त्यांच्यापर्यंत पोहोचत आहे आणि यापुढेही शासनाच्या विविध योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत राहतील.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल हॉल येथे कोपरगाव मतदारसंघातील ६२६ नोंदणीकृत बांधकाम कामगारांना आ. काळे यांच्या हस्ते गृहपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले. पान ४

# गुरुपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** गुरुपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा देवस्थानं शिर्डी, सदगुरू जनार्दन स्वामी महाराज आश्रम, आत्मा मालिक ध्यानपीठ येथे दरवर्षी हजारोंच्या संख्येने भाविकांची मांदियाळी येते. या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सुरक्षिततेसाठी व सुसूत्र आयोजनासाठी नियोजन पाहणी पार पडली.



> गुरुपौर्णिमा हे आत्मा मालिक संप्रदायासाठी अत्यंत पवित्र पर्व आहे. भाविकांच्या सेवेसाठी आपले सेवेकरी कटिबद्ध आहेत. प्रशासनाचे सहकार्य मिळाल्यास भाविकांना उत्तम सोय व सुरक्षितता पुरविता येईल.
>
> **– परमानंद महाराज**

माजी आ. स्नेहलता कोल्हे यांनी आत्मा मालिक ध्यानपीठाचे महंत प. पू. परमानंद महाराज व पोलिस उपविभागीय अधिकारी शिरीष वमने यांच्या समवेत आत्मा मालिक ध्यानपीठ येथे गुरुपोर्णिमा उत्सवाचा नियोजन आढावा घेतला. यावेळी भाविकांची गर्दी, वाहतूक व्यवस्थापन, रस्त्यांची अवस्था आणि आपत्कालीन उपाययोजना यावर सखोल चर्चा झाली.

पुणतांबा फाटा, श्री साईबाबा कॉर्नर या कोपरगाव शहरा लगत असणाऱ्या ठिकाणी वाहतूक कोंडी आणि अपघातांचे अनेकदा प्रकार उत्सव काळात घडतात त्यामुळे स्नेहलता कोल्हे यांनी याबद्दल आवश्यक ती सूचना केली आहे.

> गुरुपौर्णिमा हा श्रद्धेचा व शिस्तीचा संगम आहे. भाविकांची संख्या लक्षात घेता प्रशासन, सेवा संस्थांचे समन्वय महत्त्वाचे आहे. आपली जबाबदारी म्हणून मी स्वतः लक्ष ठेवून आहे. यामुळे गुरुपौर्णिमा उत्सवाचे नियोजन अधिक चोख आणि जनहितकारी होण्यास हातभार लागणार आहे.
>
> **– स्नेहलता कोल्हे, माजी आमदार**

स्नेहलता कोल्हे यांनी यावेळी राष्ट्रीय महामार्गाचे उपअभियंता जमाळे यांच्याशी संपर्क साधून स्पष्ट सूचना दिल्या की, नगर-मनमाड महामार्गावरील खराब पान ४

# शेअर मार्केटचा नवा फंडा, नागरिकांना लाखोंचा गंडा?

## नागरिकांचे कोट्यवधी लाटल्याच्या घटना; शिर्डी, सुपा, श्रीगोंदा अन् शेवगावातही लुटले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील नागरिकांचे करोडो रुपये कंपन्यांमध्ये गुंतवून घेतले, त्यानंतर थोडे दिवस परतावाही दिला. त्यानंतर मात्र या कंपन्यांनी आपला गाशा गुंडाळल्याने, या कंपन्यांनी अहिल्यानगरमधील नागरिकांना कोट्यवधींचा चुना लावला असल्याने शेअर मार्केटने नवा फंडा आणून नागरिकांना लाखोंचा गंडा घातल्याने ऑनलाईन शेअर मार्केटमध्ये पैसा गुंतवल्याचे धाबे दणाणले आहेत.

### शेअर अन् कंपन्यांच्या घोटाळ्याचा पर्दाफाश

जादा परताव्याचे आमिष, महिनाभरात पैसे डबल करण्याचे आमिष दाखवत जादा पैसे देणाऱ्या अनेक कंपन्या अन् त्यांचे घोटाळे करणारे समोर आले आहेत. जादा परताव्याचे आमिष देत या कंपन्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक नागरिकांचे करोडो रुपये लुटले आहेत. त्यातच श्रीगोंद्यात इन्फिनाइट बिकनफकडून कोट्यवधींची फसवणूक, सुप्यातील कंपनीचा हजार कोटी रुपयांना गंडा तर शिर्डीत मग्रो मोअरफ आणि शेवगामध्येही शेअर मार्केटच्या नावाखाली चुना लावल्याचे प्रकार उघडकीस आले आहे. त्यामुळे ज्यादा अमिषाच्या परताव्याने गुंतवणूक केलेल्या नागरिकांचे धाबे दणाणले असून त्यांनी पोलीस प्रशासनाकडे धाव घेतली असल्याची ही चर्चा नागरिकांतून होत आहे.



### एसपींच्या कारवाईकडे जिल्ह्याचे लक्ष?

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे शेअर मार्केट व कंपनीकडून नागरिकांची झालेली फसवणूक अन् त्या नागरिकांनी केलेल्या तक्रार व संबंधितांवर पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्ह्यांवर त्वरित अँक्शन घेवून शेअर मार्केट तसेच कंपन्यांवर धडक कारवाई करणार का? तसेच त्यांच्याकडून नागरिकांची आर्थिक फसवणूकीमधील त्यांचे पैसे परत मिळवून देणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पारनेर तालुक्यातील सुपा येथील एका कंपनीने दामदुप्पटसह जादा परताव्याचे आमिष दाखवून नगर व पुणे जिल्ह्यातील शेकडो गुंतवणकदारांना एक हजार कोटी रुपयांना गंडा घातला आहे. या कंपनीमालकाने दुबईला धूम ठोकली असल्याची चर्चा आहे. गेल्या एक ते दीड वर्षापासून शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवून महिन्याला गुंतवणुकीवर पान ४

# तीन महिन्यांचा घनकचरा कर माफ करा

## माजी नगरसेवक निखिल वारे यांची महानगरपालिका प्रशासनाकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर शहरातील सध्या निर्माण झालेली घनकचरा संकलनाची स्थिती ही चिंतेचा विषय बनलेली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून संपूर्ण शहरात कचरा संकलनाचे नियोजन पूर्णपणे ढासळले आहे. कुठे आठवडाभर कचरा उचलला जात नाही, तर कुठे नागरिकांना दुर्गंधी, रोगराई, आणि अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गेल्या तीन महिन्यांचा घनकचरा कर तात्काळ माफ करण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक निखिल वारे यांनी सहायक आयुक्त सपना वसावा यांच्याकडे मागणी केली आहे.



निखिल वारे म्हणाले की, शहरातील अहिल्यानगर, सावेडी, भोसलेनगर, नागापूर, रेल्वे स्टेशन परिसर, आणि अनेक रहिवासी व व्यावसायिक भागात गेल्या कित्येक आठवड्यांपासून कचरा संकलनासाठी वाहनच आलेले नाही. नागरिक वारंवार तक्रार करत असतानाही प्रशासनाचे दुर्लक्ष हे दुर्भाग्यपूर्ण आहे. महापालिकेने ज्या एजन्सीकडे कचरा संकलनाचे कंत्राट दिले आहे, त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास स्पष्टपणे अपयशच दर्शवले आहे. या बेजबाबदार कारभारामुळे शहरात दुर्गंधी पसरलेली असून, संपूर्ण नगरचे 'बकालीकरण' झालेले आहे.

शहरातील नागरिकांकडून दरवर्षी लाखो रुपयांचा घनकचरा कर वसूल केला जातो, परंतु त्या मोबदल्यात त्यांना कोणतीही मूलभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळलेली आहे. शहरातील रस्ते, गल्ली-बोळ, बाजारपेठा या सर्व ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. एकीकडे करोडो रुपये खर्चून रस्ते तयार केले जात आहेत, पण दुसरीकडे घनकचरा व्यवस्थापनाच्या निष्क्रियतेमुळे तेच रस्ते पुन्हा अस्वच्छतेने भरले जात आहेत.

गेल्या तीन महिन्यांचा घनकचरा कर तात्काळ माफ करण्यात यावा. ज्या भागात नियमितपणे कचरा उचल झाला नाही, त्या भागासाठी विशेष मोहीम राबवून तातडीने स्वच्छता करण्यात यावी. कचरा संकलन पुन्हा पूर्णपणे सुरळीत सुरू होईपर्यंत कोणत्याही नागरिकाकडून घनकचरा कर वसूल करू नये. कंत्राटी एजन्सीवर दंडात्मक कारवाई करून नवीन व जबाबदार एजन्सी नेमण्याचा विचार करण्यात यावा, अशी मागणी महापालिकेकडे केली आहे.

**अन्यथा नागरिकांचा रोष वाढेल : वारे**

स्वच्छ भारत, सुंदर नगर ही संकल्पना फक्त बॅनरपुरती राहू नये, तर ती जमिनीवर उतरली पाहिजे. नागरिकांचे आरोग्य, सन्मान आणि पैसा या तिन्ही बाबींचा विचार करून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा नागरिकांचा रोष प्रचंड वाढेल आणि त्याची सर्व जबाबदारी महापालिकेवर असेल, असा इशाराही निखिल वारे यांनी दिला.

---

नागरिकांनी कर भरून जर सेवाच मिळत नसेल, तर तो कर माफ करणे ही नैतिक जबाबदारी महापालिकेची आहे. कचरा उचलला गेला नाही, गाडी आली नाही, आणि सेवा मिळाली नाही. हेच वास्तव असेल, तर नागरिकांचा कर वसूल करणे अन्यायकारक आहे.

**– निखिल वारे, माजी नगरसेवक**

# शाळेतून विद्यार्थ्यांना 'मॉरल सपोर्ट' मिळणार

## आ. सत्यजित तांबे; अकोलेतील 'रविवारची शाळा' स्तुत्य उपक्रम



मुलांनो तुम्ही कोणत्या परिस्थितीत जन्माला आले ते कुणाचे हातात नाही. मात्र आपण कष्टाने अदाणी –अंबानी होवू शकतो हे तुमच्या हातात आहे. आजपर्यत क्रांती केलेले महापुरुष असेल किंवा असामन्य काम करणारी लोक हि अडचणीतून कष्टातुन आलेल्या कुटुंबातीलच आहेत. त्यामुळे आपण कुठे जन्मलो याने खचून न जाता पुढे जात राहावे.

**– सत्यजित तांबे, आमदार**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** 'विवारची शाळा' अकोलेत सुरु होत आहे. हा स्तुत्य उपक्रम असुन या रविवारच्या शाळेतून मुलांना आवश्यक असणारा मॉरल सपोर्ट निश्चित मिळेल. खुप दिवसापासून माझ्या मनात असलेली संकल्पना अकोल्यात साकारली जाते, याबद्दल मला आनंद आहे. भविष्यात या उपक्रमास आवश्यक ती मदत करू, असा विश्वास नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे यांनी व्यक्त केला.

श्री समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत 'रविवारची शाळा' या पत्रकार श्रीनिवास रेणुकदास यांच्या संकल्पनेतील उपक्रमाचा अकोलेतील सर्वोदय वस्तिगृहात शुभारंभ आ. तांबे यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगर येथील सावली संस्थेचे प्रमुख नितेश बनसोडे होते. याप्रसंगी बुवासाहेब नवले मल्टिस्टेटचे चेअरमन विक्रम नवले, डी. के. गोर्डे, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर, अमोल वैद्य, मंगेश कराळे, बाळासाहेब भोर, प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, आरीफ तांबोळी, जादूगार पी. बी. हांडे, श्रीनिवास रेणुकादास आदि उपस्थित होते.

आ. तांबे म्हणाले की, मुस्लिम समाजात आजही १० वी नंतर शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण ती मुले १० वी नंतर लगेच कमवायला लागतात. मग ते गॅरेज असेल किंवा इतर ठिकाणी काम करतात. कारण त्याची परिस्थितीही तशी असते व पालक वर्गही अशिक्षित असतो. समाजात जी पालक शिकलेले नाहीत. त्यांना शिक्षणाविषयी माहित नाही. त्यांना प्रवाहात आणने गरजेचे आहे तसेच मुलांना आत्मविश्वास देणे गरजेचे आहे. त्यांना हा मॉरल सपोट या रविवारच्या शाळेतून मुलांना मिळेल. याप्रसंगी नितेश बनसोडे, उद्योजक डी. के. गोरडे, अमोल वैद्य, घनश्याम माने यांची भाषणे झाली.

# 'ग्रीन स्पार्क'च्या चिमुकल्यांकडून संत परंपरेचा जागर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राच्या संत परंपरेचा जागर करुन ग्रीन स्पार्क स्कूलची आषाढी एकादशीनिमित्त दिंडी रंगली. दिंडीत श्री विठ्ठल रुख्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, सोपानदेव, नामदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांच्या वेशभूषेत असलेल्या दिंडीतील चिमुकल्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधले. बाल वारकऱ्यांच्या दिंडीने विठूरायाचा गजर केला.

शाळेच्या संस्थापिका प्रा. हेमलता पाटील व शिक्षिका वैशाली वायभासे यांच्या मार्गदर्शनाखाली सारसनगर भागातून ही दिंडी काढण्यात आली होती. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या जय घोषात, पारंपरिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थी उत्स्फूर्तपणे दिंडीत सहभागी झाले होते. दिंडीत विद्यार्थ्यांसह पालकांचा देखील उत्साह दिसून आला.

दीपक जाजू व रती जाजू यांनी बाल दिंडीचे स्वागत करुन बाल वारकऱ्यांना खाऊचे वाटप केले. विठ्ठलाची वेशभूषा साकारलेल्या देवांश गाडळकर याने वारकरी सांप्रदायाने बंधूभाव व समानतेची शिकवण दिली असून, सर्व जाती-धर्माला बरोबर घेऊन चालण्याचा संदेश दिला.

सिया कासार हिने रखुमाईची भूमिका साकारली तर राजनंदिनी जाजू, केशवी पवार, सेजल गायकवाड, हर्षित महाजन, साई रक्ताटे, शिवेंद्र बोरकर या मुलांनी बाल संतांची रूपे साकारली होती.

# मी शिंदेसोबत असल्यानेच खंडणीचा खोटा आरोप

## आ. रोहित पवारांनी केलेल्या आरोपांना शहाजी राजेभोसलेंचे प्रत्युत्तर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** राशीन सोलर कंपनीच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करणे तसेच कामात कमिशन मागणे या प्रकरणाविषयी माझा काडीमात्र संबंध नाही. आ. रोहित पवार यांनी केवळ राजकीय द्वेषातून माझ्यावर पावसाळी अधिवेशनात बिनबुडाचे आरोप केले आहे.

आ. पवार यांच्या उमेदवारीची प्रथम मागणी करणारा राजकीय पदाधिकारी मी आहे. त्यावेळी मी त्यांना गुंड प्रवृत्तीचा आणि खंडणीखोर वाटलो नाही, असे राशीनचे शहाजी राजेभोसले यांनी पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषदेत राजेभोसले यांनी आपल्यावरील आ. पवारांनी केलेल्या आरोपांना उत्तर दिले.

राजेभोसले म्हणाले की, मी आज विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासोबत काम करीत आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मी राम शिंदे यांचा प्रचार केला व केवळ राम शिंदे यांच्यासोबत असल्यामुळेच आ. पवार यांना त्याचा राग मनामध्ये धरून कालच्या घटनेत माझा काही संबंध नसताना केवळ राजकीय द्वेष पुढे आणून माझी राजकीय कारकीर्द बदनाम करण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू केला. त्यांनी पावसाळी अधिवेशनात सभागृहात औचित्य मुद्द्यात खंडनीखोर आणि गुंड प्रवृत्तीचा उल्लेख केला. वास्तविक पाहता त्यांच्या आमदारकीच्या उदयास याच शहाजी राजेभोसले यांनी शरद पवार यांच्याकडे मागणी केली होती. याचा विसर त्यांना पडला असावा.

त्यांनी १५ कोटी रुपयांची खंडणी मागितली असल्याचा आरोप केला. ज्या व्यक्तीने माझ्यावर खोटी फिर्याद दाखल केली. तो कंपनीचा वाहनचालक आहे. वाहन चालकांकडे १५ कोटी रुपये खंडणी कोणी मागू शकतो का? याची शहानिशा आ. पवारांनी प्रथम करून नंतर सभागृहात बोलायला हवे होते. केवळ राजकीय आकासापोटी त्यांनी शहाजी राजेभोसले यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करायला लावला आहे.

आ. पवारांनी माझ्या खोट्या प्रकरणात जेवढी तत्परता दाखवली. तेवढीच तत्परता त्यांनी शिंपोरा पुलाच्या प्रकरणात दाखवली असती तर तेथील स्थानिक ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला असता. केवळ आपल्या स्वार्थासाठी आणि राजकीय पोळी भाजण्यासाठी एवढा आटापिटा एका मोठ्या राजकीय माणसाने करणे उचित नाही. आम्ही जनतेसाठी काम करीत आहोत. आजपर्यंतचा इतिहास आपण पाहून यापुढे राजेभोसले कुटुंबावर बोलावे.

**– शहाजीराजे भोसले**

# अस्थिव्यंग व्यक्तींसाठी कृत्रिम अवयव वितरण शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकारच्या भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम कानपूर, एस. आर. ट्रस्ट, मध्यप्रदेश, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, एडीप योजनांतर्गत दि. १५ जुलै रोजी साई विठ्ठला लॉन्स, चितळी रोड, राहाता येथे तर सोमवार दि. २१ जुलै रोजी श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल, विमानतळ रोड, श्री कृष्ण नगर शिर्डी येथे करण्यात आल्याची माहिती डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. अभिजित दिवटे यांनी दिली.

अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव वितरण शिबिराचे आयोजन जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये कृत्रिम हात, पाय बसविणे, कॅलिपर्स यांचे मोजमाप आणि तात्काळ मोफत जागेवर साहित्य वाटप होणार आहे. या शिबिरामुळे दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स तयार करून घेण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे दोनही शिबीर होणार आहे. राहाता तालुक्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, प्रकल्प समन्वयक डॉ. दिपक अनाप, डॉ. अभिजित मेरेकर, माधवराव चौधरी, वैशाली चौधरी यांनी केले आहे.

# निराधारांना आधार देणाऱ्या 'बालघर'ला सहकार्य करा : जगताप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नगर :** येथील तपोवन रोडवरील अनाथ व निराधारांना आधार देण्याचे काम अभिनव बालघर प्रकल्प करत आहे. येथील मुलांना आपल्या आनंदांत सहभागी करून घ्या, आपण भेट दिल्यावर त्यांना व आपल्याला जे समाधान मिळते ते कोठेही मिळत नाही म्हणून आपला वाढदिवस या ठिकाणी साजरा करावा, असे आवाहन पतित पावन संघटनेचे उपनगराध्यक्ष संदीप जगताप यांनी केले

पतित पावन संघटनेच्या वतीने उपनगराध्यक्ष संदीप जगताप यांचा वाढदिवसानिमित्त अभिनव बालघर प्रकल्पातील अनाथ व निराधार मुलांसमवेत केक कापून व मुलाना खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष गोरक्षनाथ सोनवणे, अमोल दरंदले, मनोज भोसले, स्वप्निल फुंदे, विकी खरात, ऋषी मठारे, अभि भाऊ, गणेश कांबळे, बबलू पाडळे, संदीप ढाकणे, चड्डा शेठ, लकी शेठ, प्रणव धायगुडे, संतोष दुडगे, योगेश क्षीरसागर, आशिष लहारे, प्रवीण पाटोळे, लक्ष्मण दिघे, अमोल शिरसाट, बालघर प्रकल्पाचे युवराज गुंड आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

अनाथ विद्यार्थाना समाजात तसेच शैक्षणिक दशेत आणण्यासाठी अभिनव प्रकल्प काम करत आहे. त्यांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. तसेच अभिनव बालघर प्रकल्पाच्या कार्यास जगतापांचे नेहमी कायम सहकार्य राहणार आहे.

**– गोरक्षनाथ सोनवणे**

# परिक्रमा कॉलेजचे रंधवे एनआयएस परीक्षा उत्तीर्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारतीय क्रीडा मंत्रालय, भारतीय क्रीडा प्राधिकरण व नेताजी सुभाष इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट पतियाळा, पंजाब यांच्या विद्यमाने भारतातील दोनशे क्रीडा प्रशिक्षकांची एनआयएस क्रीडा प्रशिक्षक कोर्स साठी निवड करण्यात आली होती. यादरम्यान घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून परिक्रमा कॉलेजचे क्रिडा शिक्षक प्रा. रोहन रंधवे हे अ श्रेणीत एनआयएस प्रशिक्षक व मार्गदर्शक परीक्षा उत्तीर्ण झाले.



त्यांच्या यशाबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलनाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाचपुते, सचिव आ. विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ड. प्रतापसिंह पाचपुते, अकॅडमी डायरेक्टर प्रा.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, प्रा. डॉ. संजीव कदम, प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, प्राचार्य डॉ. सुदर्शन गिरमकर, प्राचार्य मोहन धगाटे, प्राचार्य डॉ. रमेश शिंदे, प्राचार्य डॉ. पांडुरंग इथापे, प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले आहे.

# ... अखेर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची प्रतीक्षा संपली

## ५० टक्के रकमा थेट खात्यात वर्ग होणार : गणेश गायकवाड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अवसायानात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांची प्रतिक्षा अखेर संपली असून प्रशासनाने यापूर्वी घोषित केल्याप्रमाणे पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के रक्कम थेट ठेवीदारांच्या खात्यात आज पासून वर्ग होणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

ड ी आ ा य स ी ज ी स ी कार्यालयाकडून सदरचे ना हरकत प्रमाणपत्र बँक प्रशासनास प्राप्त झाल्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रक्कम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी अपडेट केलेल्या १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम आज पासून शाखानिहाय संबंधित ठेवीदारांनी दिलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत.

# थकबाकी भरल्यास करारनाम्यांचे नुतनीकरण करणार

## आयुक्त यशवंत डांगे; मनपाच्या खुल्या जागा, खोल्या, गाळ्यांच्या भाडे वसुलीसाठी विशेष मोहीम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** बहुतांश भाडेकरूंकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे हि रक्कम सुमारे २५ कोटि पेक्षा अधिक आहे. या थकबाकी वसुलीसाठी उपायुक्त, सहाय्यक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली मार्केट विभागाची दहा पथके नियुक्त करण्यात आली आहेत. वसुली, नुतनीकरण, कारवाईसाठी विशेष मोहीम महानगरपालिकेमार्फत राबवण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.



आयुक्त डांगे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मार्केट विभागाकडून तयार करण्यात आलेला सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात आला.

शहरात महानगरपालिकेची ३३ व्यापारी संकुले आहेत. त्यातील ७४२ गाळे भाड्याने दिलेले आहेत. तसेच, ७४ खुल्या जागा, सात शाळांमधील ८२ वर्ग खोल्या, दोन मंगल कार्यालये, तीन ठिकाणी पे अँड पार्कसाठी जागा व दोन व्यायाम शाळा भाडेतत्वावर देण्यात आल्या आहेत. त्यातील ६८२ भाडेकरूंचे करार संपुष्टात आलेले आहेत. १६१ गाळ्यांमध्ये पोटभडेकरु आहेत. यासह १३० गाळ्यांमध्ये परस्पर फेरबदल करण्यात आल्याचे महानगरपालिकेच्या सर्वेक्षणात समोर आले आहे. या भाडेकरूंकडे मोठ्या प्रमाणात थकबाकीही आहे. एकूण थकबाकी २५ कोटीहून अधिक आहे.

थकीत भाडे वसुलीसाठी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश देत उपायुक्त, सहाय्यक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली मार्केट विभागाची दहा पथके नियुक्त केली आहेत. भाडे वसुली, करारनाम्यांचे नुतनीकरण, कारवाई या पथकांकडून केली जाणार आहे. थकबाकीदार गाळे धारकांनी सर्व थकबाकी एकरकमी भरल्यास राज्य शासनाच्या निर्देशानुसार अनामत रक्कम व नवीन भाडे निश्चित करून करारनामे करून देण्यात येणार आहेत. ज्या गाळेधारकांनी परस्पर बदल केले आहेत, त्यांना ५० हजार रूपये दंड करण्यात येणार आहे. मुदत संपलेल्या व थकबाकीदार गाळेधारकांना गाळे नुतनीकरण करून घेण्यासाठी ही संधी आहे. या संधीचा लाभ घेऊन तत्काळ थकबाकी भरावी व करार नुतनीकरण करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

अनेक गाळेधारकांनी महानगरपालिकेच्या करारनाम्याचे उल्लंघन करून परस्पर पोट भाडेकरू ठेवले आहेत. त्यांच्याकडेही मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. अशा गाळेधारकांनी थकीत रक्कम भरून करार नुतनीकरण न केल्यास त्यांच्यावर कारवाई करून गाळे जप्त करण्यात येणार आहेत. त्यानंतर लिलाव करून गाळे पुन्हा भाड्याने दिले जातील.

**– यशवंत डांगे, आयुक्त**

# ४३ गाव पाणीपुरवठा योजनेचे पाईप चोरीला

## मुंगूसवाड्यात आढळले पाईप, प्रशासन व ठेकेदारांची निष्क्रियता उघड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : भगवानगड व त्याच्यासोबत ४३ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाकांक्षी योजनेतील लोखंडी पाईप चोरीचा धक्कादायक प्रकार मुंगूसवाडे गावात उघडकीस आला आहे. एकनाथवाडी रोड कॉर्नर परिसरात खासगी शेतात मोठ्या प्रमाणात लोखंडी पाईप साठवलेले आढळून आले. हेच पाईप पूर्वी गावाच्या चौकात साठवून ठेवलेले होते, हे ग्रामस्थांच्या लक्षात आले. विशेष म्हणजे हे पाईप संबंधित व्यक्तीने चोरून शेतात नेले असून, मला हे पाईप अधिकाऱ्यांनी विकले आहेत, अशी माहितीही पुढे आली आहे.

भगवानगड व ४३ गावांच्या पाणीपुरवठा योजनेतून पाईप चोरीचे प्रकार वारंवार घडत असल्यामुळे या प्रकरणी वरिष्ठ पातळीवर चौकशी व्हावी, दोषींवर कठोर कारवाई करावी, ही ग्रामस्थांची जोरदार मागणी आहे.सरकारी योजना व जनतेच्या विश्वासावर गदा येऊ नये, यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने कठोर आणि पारदर्शक पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा जलयोजनेवर परिणाम होऊन नागरिकांना त्याचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्याच्या भराव व खडीकरणाच्या कामादरम्यान काही मोठे लोखंडी पाईप



जमिनीत आढळून आले. ग्रामस्थांनी पाहणी केली असता ते भगवानगड पाणीपुरवठा योजनेशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले. यापूर्वीही या योजनेच्या पाईप चोरीबाबत तक्रारी झाल्या असून पोलिसांतही गुन्हे दाखल आहेत. मात्र, पुन्हा तसाच प्रकार घडल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

ग्रामस्थांनी त्वरित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व योजनेचे ठेकेदार यांच्याशी संपर्क साधून माहिती देण्यात आली. परंतु दोन्हीकडून केवळ थांबा तोंडी माहिती दिली आहे. पोलिसांशी संपर्क केला अशी उत्तरं देण्यात आली. कारवाईच्या नावाखाली केवळ वेळकाढूपणा करून तक्रारीनंतर अखेर ठेकेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी घटनास्थळी आले. मात्र, त्यांनी फक्त चोरट्यांनी पुरलेले पाईप बाहेर काढले व घेऊन गेले. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, त्यांनी कोणताही गुन्हा दाखल केला नाही. संबंधित चोरट्याला केवळ समज दिली गेली आणि प्रकरण थंडावले.

पाईपची चोरी झाली असताना संबंधित व्यक्तीला फक्त समज देऊन सोडण्यात आले कोणताही गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे पाईप प्रकरणात ठेकेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून या घटनेची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे.

---

# कोपरगावात मोकाट जनावरांचा उपद्रव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव शहरात मोकाट आणि कुपोषित जनावरांचा त्रास दिवसेंदिवस वाढतच चाललेला असून या जनावरांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्य रस्त्यावर गाय, वासरे, वळू यांच्यासह मोकाट कुत्र्यांचा देखील मुक्त वावर असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षितेचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे.



शहरातील अनेक प्रभागांमध्ये तसेच शाळा, कॉलेजेस सरकारी कार्यालयाच्या रहदारीच्या रस्त्यावर सकाळच्या वेळेस जनावरे मोकाट सोडण्यात येतात व रात्रीच्या वेळात या गाई गायब होतात. सकाळ झाल्यावर पुन्हा रोडवर सोडून दिल्या जातात. ही जनावरे दिवसभर अन्नाच्या शोधात बाजारपेठ, मेन रोड, भाजी मंडई, शाळा कॉलेज रोड, सरकारी कार्यालय रस्ता अशा वर्दळीच्या ठिकाणी अन्नाच्या शोधात भटकत असतात.

मात्र काही जनावरे अन्न न मिळाल्याने ती जनावरे अधिकच हिंस्त्र प्रवृत्तीची झाली असून त्यांना हूसकवण्याचा प्रयत्न केल्यास ती जनावर नागरिकांच्या अंगावर धावून जातात. त्यामुळे त्यांना हाकालणाऱ्यांना देखील भीती निर्माण झाली आहे.

### नगपरिषदेचा कानाडोळा

कोपरगाव नगरपरिषद या गोष्टीकडे का? काना डोळा करते, हा सर्वसामान्य कोपरगावकरांना पडलेला प्रश्न आहे. तसेच कचरा साचलेल्या ठिकाणी अनेकदा ही मोकाट जनावरे अन्ना सोबत प्लास्टिकही खातात. त्यामुळे त्यांचे आरोग्य देखील खराब होते. तेव्हा कोपरगाव नगरपरिषदेने शहरातील वाढत्या जनावरांचा उपद्रव लक्षात घेता तातडीने ठोस उपाय योजना राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी नागरिकांमधून नगरपरिषदेकडे मागणी होत आहे.

---

# पारनेरात ‘शैक्षणिक धोरण कार्यशाळा’

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी या विषयांतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे पारनेर महाविद्यालयात यशस्वी आयोजन करण्यात आले.

नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या पारनेर महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विभाग व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करता यावी, या हेतूने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये तज्ज्ञ व्याख्याते म्हणून शिरूर येथील चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिक्षणापासूनच शिक्षणाची गोडी लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शालेय शिक्षण स्तरावरील शिक्षकांकडे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे.




या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, प्रा. नितीन निपुंगे आदी प्रध्यापक, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालय प्रवेश समितीचे प्रमुख प्रा. डॉ. दिलीप ठुबे यांनी केले, आभार डॉ. रघुनाथ नजन यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. हरेश शेळके यांनी केले.

प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले की , राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मूळ उद्देश प्राप्त करण्यासाठी आपण शिक्षक या नात्याने सर्वजण कटिबद्ध आहोत. या शैक्षणिक धोरणाचा हेतू साध्य करण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालये यांचा एकमेकांबरोबर समन्वय असणे गरजेचे आहे.

---

# कोतवाल पदभरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

## पाथर्डी तालुक्यात १३ पदांसाठी भरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी उपविभागातील महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या संदर्भात ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात दि. ८ जुलै पासून झाली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत १८ जुलै पर्यंत निश्चित करण्यात आली आहे. परीशासनाच्या विशेष मान्यतेने पदभरती महसूल व वन विभागाच्या दि. १७ मे २०२३ रोजीच्या पत्रानुसार, महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील ८० टक्के मर्यादित पदे भरण्यास शासनाने विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे. परीक्षाशुल्क भरण्याचीही हीच अंतिम तारीख आहे. संकेतस्थळावर अर्ज सादर करावयाचा आहे. इतर कोणत्याही पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पाथर्डी तालुक्यातील १३ कोतवाल पदांची भरतीपाथर्डी तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील एकूण १६ रिक्त पदांपैकी ८०% म्हणजेच १३ पदे भरली जाणार आहेत.



यामध्ये विविध सामाजिक संवर्ग व प्रवर्गांसाठी आरक्षण आहे. या भरती प्रक्रियेतील कोणत्याही वाद, तक्रारी अथवा बदलाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवड समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी, पाथर्डी यांच्याकडे राहणार आहे. तसेच, पदसंख्या किंवा संवर्गात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकारही समितीकडेच आहेत.

### या गावात होणार कोतवाल भरती

शिराळ (इतर मागासवर्गीय), मोहज बु. (भटक्या जमाती व विमुक्त जाती,महिला), लोहसर (अराखीव,महिला), कासार पिंपळगाव (अनुसूचित जमाती), मिरी (अराखीव), पाथर्डी (इतर मागासवर्गीय), कारेगाव (इतर मागासवर्गीय, महिला), येळी (इतर मागासवर्गीय), मुंगूसवाडे (सामाजिक व शैक्षणिक मागास, महिला), सांगवी बु. (आर्थिक दुर्बल घटक), चिचोंडी (आर्थिक दुर्बल घटक), मढी (अराखीव), अकोला ( सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग) या गावातील कोतवाल भरती प्रक्रिया सुरू झाली आहे.

---

# कोपरगावात लाखोंचा गुटखा पकडला



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : समृद्धी महामार्गावर पोलिसांनी लाखोंचा गुटखा पकडला आहे. पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. पकडलेला गुटखा काही अहिल्यानगर जिल्ह्यात, तर काही भिवंडी-मुंबईकडे जाणार होता, त्याच दरम्यान पोलिसांनी सापळा रचून लाखोंचा गुटखा जप्त केला आहे.

समृद्धी महामार्गाच्या शिर्डी इंटरचेंजवर पोलिसांनी प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणारा ट्रक पकडला. या कारवाईत लाखो रुपयांच्या गुटख्यासह ७७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलिस उपाधीक्षक संतोष खाडे यांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली आहे. पकडलेला काही माल अहिल्यानगर जिल्ह्यात, तर काही माल भिवंडी मुंबईकडे जाणार होता. पोलिसांनी सापळा रचून लाखो रुपयांचा गुटखा ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

# कोपरगावातील ग्रामपंचायतींसाठी हवामान केंद्र

## आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्याला यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : पर्जन्यछायेखाली येत असलेल्या कोपरगाव मतदार संघातील मोजक्याच गावांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्र असल्यामुळे कमी पर्जन्यमान किंवा अतिवृष्टीमुळे नुकसान होवूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा फायदा मिळत नव्हता. त्यामुळे कोपरगाव मतदार संघात जास्तीत जास्त स्वयंचलित हवामान केंद्र बसवावे, अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी लावून धरली होती. त्या मागणीला अखेर यश आले असून कोपरगाव मतदार संघातील ज्या गावात स्वयंचलित हवामान केंद्र नाही, त्या प्रत्येक ग्रामपंचायतींसाठी स्वयंचलित हवामान केंद्र बसविले जाणार असल्याची माहिती आ. काळे यांनी दिली आहे.



कोपरगाव तालुक्याच्या सहा मंडलामध्ये एकूण सहा स्वयंचलीत हवामान केंद्र अस्तित्वात आहे. हि संख्या अत्यंत कमी असल्यामुळे पिक विम्याचे निकष लावतांना अडचणी निर्माण होवून मागील अनेक वर्षापासून बहुतांश शेतकरी अतिवृष्टी, पूर, दुष्काळ व हवामान आधारित फळबाग पीकविमा योजनेपासून वंचित राहत होते. त्याबाबत आ. आशुतोष काळे यांनी तात्कालीन कृषी मंत्री व तात्कालीन पालकमंत्री यांच्याकडे देखील त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्याची दखल घेवून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांनी २०२५ चा अर्थसंकल्प मांडतांना ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारणार हा अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी केंद्र व राज्य शासन संयुक्तपणे करणार आहे.


---

# रस्त्यासाठी लंकेंचा ११ जुलैला उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या एमएच १६६० या महामार्गाच्या रूंदकरणाच्या कामात प्रचंड दिरंगाई होत असल्याने जनतेमध्ये नाराजीचा सुर उमटत असून या नाराजीची दखल घेत खासदार नीलेश लंके यांनी थेट राष्ट्रीय महामार्ग प्रधिकरण आणि प्रकल्प अंमलबजावणी विभागास इशारा देत ११ जुलैपासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

खा. लंके निवेदनात म्हटले आहे की, सावळी विहीर किमी ८८.४०० ते अहमदनगर बायपास किमी १६३.४०० या ७५ किमी लांबीच्या फोर लेन महामार्ग रूंदीकरणासाठी भारत कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा. लि., देहरादून या कंपनीला ठेका देण्यात आला असून २१ मार्च २०२५ रोजी ठेका करार पार पडला होता. २९ एप्रिल रोजी सबंधित कंपनीस काम मंजुर होउनही आज अखेर कोणतेही काम प्रत्यक्ष सुरू झालेले नाही.



हा प्रकल्प भारतमाला योजनेअंतर्गत मंजूर असून या मार्गावर प्रचंड वाहतूक असते. जिल्हयातील शेतकरी, विद्याथ, वाहनचालक यांना दररोज अपुऱ्या आणि धोकादायक रस्त्यांवरून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यूच्या घटनाही घडत आहेत, असे लंके यांनी नमूद केले आहे.

### प्रशासन आणि ठेकेदाराच्या निक्रियतेवर संताप

कामाची मंजुरी देण्यात आल्यानंतर दोन महिने उलटलेले असताना एकही यंत्र, मनुष्यबळ वा साहित्य तैनात न केले जाणे, हे प्रकल्पातील गंभीर निष्क्रियतेचे द्योतक असल्याची संतप्त भावना खासदार लंके यांनी यासंदर्भात दिलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. या स्थितीवर प्रतिक्रया देताना खा. लंके म्हणाले, दिवसेंदिवस नागरिकांच्या तक्रारी वाढत असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जनतेमध्ये असंतोष उफाळला आहे. काम तातडीने सुरू न झाल्यास हजारो नागरिकांसह मी स्वतः बेमुदत उपोषण करणार आहे.

---

# ऊस वाढीसाठी शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञानाची मदत

## थोरात साखर कारखाना करणार प्रात्यक्षिकासाठी प्लॉट उभारणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने शेतकरी ऊस उत्पादक व कामगार यांच्या जीवनात आनंद निर्माण करताना उच्चांकी भाव दिला आहे. महाराष्ट्रात ऊस शेती क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून आपल्या कार्यक्षेत्रात ऊस वाढ कार्यक्रमांतर्गत नव्याने एआय वापरासाठी प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यात येणार असून यामध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी केले आहे.




कृत्रिम बुद्धिमत्ता एआय प्रणाली बाबत अधिक माहिती देताना घुले म्हणाले की, जागतिक स्तरावर शेती आरोग्य व शिक्षण या क्षेत्रामध्ये एआय चा वापर वाढला आहे. या पद्धतीमुळे अंदाजे ऊस उत्पादनात ३० ते ४० टक्के वाढ होऊन पाण्याची ३० टक्के बचत होते. खते, रोग व कीड नियंत्रण औषधांच्या खर्चामध्ये ४० ते ५० टक्के बचत होते असे प्रायोगिक तत्त्वावर सिद्ध झाली आहे.

थोरात कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर करण्यात येणार यासाठी २५ शेतकऱ्यांचे समूह गट तयार करण्यात येणार आहे. गटनिहाय ऊस पीक प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यात येणार आहेत. यामध्ये त्या भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक सहभाग असणार आहे.

### शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करावी

याबाबतच्या अधिक माहितीसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी कारखान्याच्या शेती व ऊस विभागाशी संपर्क करावा किंवा गट ऑफिसमध्ये आपली नाव नोंदणी २० जुलै २०२५ पर्यंत करावी, असे आवाहन सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.

---

# प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूलमध्ये वर्धापन दिन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : राहाता तालुक्यातील प्रवरानगर येथे प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूलमध्ये १७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधी धामणे हिने केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे शाळेचा माजी विद्यार्थी बांधकाम व्यावसायिक शुभम जोंधळे उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ दहावीच्या वर्गातील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थी जीवनात शाळेचा फार मोलाचा वाटा असतो हे प्रकर्षाने सांगितले आणि शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले. नंतर विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सीईओ डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



## संपादकीय

# वीजेची स्वस्ताई की धूळफेक?

अलिकडेच सरकारने विजेचे दर कमी केल्याची जाहिरातबाजी आपण पाहिली. त्याचा मोठा गवगवाही पाहिला. मात्र वस्तुस्थिती वेगळी आहे. २००३ चा वीज कायदा आल्यापासून महावितरणसह कोणत्याही वीज वितरण कंपनीला वीजदर ठरवायचा अधिकार नाही. त्यासाठी स्वतंत्र, स्वायत्त यंत्रणा निर्माण केली गेली. त्याला राज्य वीज नियामक आयोग असे म्हटले गेले. आपल्याकडे १९९९ पासून हा आयोग अस्तित्वात असून खरे तर त्यांनी आत्तापर्यंत खूप चांगले काम केले होते. महावितरणसारख्या कंपन्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, विजेचे दर ठरवून देणे, त्यासाठी ग्राहकांसह सर्वांशी चर्चा करणे, ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेणे आणि सुवर्णमध्य काढून योग्य तो दर ठरवणे हे या आयोगाचे काम आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे गेली काही वर्षे हे काम व्यवस्थित होत होते. पण गेल्या दोन-चार वर्षांमध्ये आयोगाने सगळेच बिघडवून टाकले. कार्यपद्धती बघायची तर महावितरणाला वीजदर ठरवण्याचा अधिकार नसल्यामुळे ते आगामी तीन वा पाच वर्षांचा वीजदराचा प्रस्ताव आयोगाकडे देतात. वीज नियामक आयोग त्याचा अभ्यास करते आणि प्रस्ताव जनतेसाठी खुला करते. अर्थात वीज नियामक आयोगालाही थेट वीजदर ठरवण्याचा अधिकार नाही. ग्राहक, स्वयंसेवी संस्था, व्यापारी संघटना, उद्योगविश्वाचे म्हणणे ऐकून घेऊन सुवर्णमध्य काढणे हेच त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये अपेक्षित आहे. असे असले तरी कोरोनाकाळात प्रत्यक्ष सुनावणी बंद झाली. मात्र त्याचा फायदा घेत तेव्हा सुरू झालेल्या ऑनलाईन सुरू केलेल्या सुनावण्या कोरोना संपून संपूर्ण जग मूळपदावर आल्यानंतरही सुरूच आहेत. नोव्हेंबर २०२४ मध्ये महावितरणने वीज नियामक आयोगाकडे नवा प्रस्ताव दिला. यात आपण काय करणार आहोत आणि आपल्याला आयोगाकडून काय हवे आहे, हे सांगितले होते. महावितरणचे आणि सगळ्यांचे म्हणणे लक्षात घेत वीज नियामक मंडळाने अभ्यास केला. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर सल्लागार नेमले. त्यांनी २८ मार्च २०२५ रोजी सुमारे ८२७ पानांचा अतिशय चांगचा सविस्तर आदेश दिला. यात त्यांनी महावितरणने मागितलेल्या रकमेपैकी ८८ हजार कोटी रुपयांची रक्कम मान्य नसल्याचे स्पष्ट केले. स्वाभाविकच महावितरणच्या मिळकतीमध्ये तेवढी घट झाली. खेरीज आयोगाने पहिल्याच वर्षासाठी दहा टक्के वीजदर कपात सुचवली. महावितरण पाच वर्षांमध्ये मिळून तीन टक्के दरकपात करणार असल्याचे सांगत असताना ही किती मोठी गोष्ट होती हे लक्षात येते. खेरीज ही कपात सर्व श्रेणींमध्ये म्हणजेच घरगुती वीजवापर, व्यावसायिक, उद्योग अशा सर्वांसाठी प्रस्तावित होती. म्हणजेच २०२५-२६ साठी प्रत्येक श्रेणीमध्ये किमान तीन-पाच-सात टक्के कपात सुचवली गेली.


ही बाब महावितरणाला पटली नाही. त्यामुळे पुढील चारच दिवसांमध्ये त्यांनी आयोगाला अर्ज केला आणि ऑर्डर काढताना खूप चुका झाल्या असून आपल्याला ती मान्य नाही, असे सांगितले. खेरीज आम्ही तुमच्याकडे पुनरावलोकनासाठी दावा दाखल करणार असल्याने मुदत वाढवून द्या, असेही सांगितले. त्यानुसार एक एप्रिलपासून लागू होणाऱ्या या ऑर्डरला स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली. वीज नियामक आयोगानेही कोणाचेही ऐकून न घेता संपूर्ण ऑर्डरला स्थगिती देऊन टाकली. तसेच नवीन ऑर्डर येईपर्यंत जुने म्हणजे ३१ मार्च पर्यंत दर सुरू ठेवण्याचा आदेश देऊन टाकला. त्यामुळे महावितरणला कोणताही तोटा झाला नाही. ते खुशच झाले. पण यातून ग्राहकांचा मोठा तोटा झाला कारण वीजदर कमी झाले नाहीत.

दरम्यान महावितरण वा आयोग या दोघांचेही म्हणजे सर्वसामान्यांपर्यंत आले नाही. २८ एप्रिल रोजी महावितरणने पुनरावलोकन याचिका दाखल केली. यात त्यांनी आयोगाने आदेश काढताना केलेल्या १०-१२ चुका दाखवून दिल्या. त्या दुरुस्त करुन नव्याने आदेश काढा, असे सांगितले गेले. मात्र पुन्हा एकदा याचिकेमध्ये दाखवली गेलेली कोणतीही बाब महावितरण आणि आयोगाकडून जाहीर करण्यात आली नाही. त्यांच्या वेबसाईटवरही काही टाकले गेले नाही. आम्हाला यात हस्तक्षेप करायचा आहे, असे सांगत काही ग्राहक संघटना त्यांच्याकडे गेल्या. मात्र त्यांचीही दखल घेतली गेली नाही. शेवटी २५ जून रोजी त्यांनी नवीन ऑर्डर काढली आणि त्यात महावितरणने काढलेल्या जवळपास सर्व चुका मान्य करुन टाकल्या. त्याचबरोबर महावितरणच्या दाव्यातील कमी केलेले ८८ हजार कोटीही त्यांना परत देऊन टाकले. विशेष म्हणजे प्रत्येक चूक मान्य करताना 'अनवधानाने चूक झाली' असे स्पष्टीकरण देण्यात आले. अशाप्रकारे वीज नियामक आयोगाने महावितरणपुढे लोटांगण घातले. महत्त्वाचे म्हणजे सर्व क्षेत्रांमधील वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव असताना केवळ शून्य ते १०० युनीट वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी दर दहा टक्क्यांनी कमी केले आणि त्याचाच प्रचंड गाजावाजा करण्यात आला. या कोलाहलात उरलेल्या १५ श्रेणीतील वीज ग्राहकांचे दर कमी केले गेले नाहीत, हे कोणाच्या लक्षातही आले नाही. उलटपक्षी, ते पाच ते सात टक्क्यांनी वाढले आहेत. घरगुती ग्राहकांमध्ये १०१ ते ३००, ३०० ते ५०० आणि ५०० च्या पुढे युनिट वापरणाऱ्यांना आता अधिक दराने वीज घ्यावी लागेल. ही लोकांची दिशाभूलच आहे. एकतर्फी दिलेली ही ऑर्डर केवळ महावितरणच्या फायद्याची आहे. महावितरण आणि आयोग हे आता वेगळे राहिलेले नाहीत, असेच म्हणायला हवे. म्हणूनच आयोग पांढरा हत्ती असून निर्णय घेण्याची क्षमता न उरलेला, प्रचंड चुका करणारा असा आयोग बरखास्त करावा, अशी मागणी पुढे आली. एकदा महावितरण ठरवेल तेच दर, हे निश्चित झाले की लोकांना त्रास तरी होणार नाही. लघुउद्योगांना प्रत्येक युनिटसाठी ८ रुपये २९ पैसे वीजदर आकारला जातो. तो आता नऊ रुपये १५ पैसे होत आहे. मोठ्या उद्योगांचा आजचा दर प्रति युनिट ८ रुपये ९६ पैसे इतका आहे. तो आता नऊ रुपये ४२ पैसे होणार आहे. म्हणजेच सर्व श्रेणींमध्ये पाच ते सात टक्क्यांनी वाढ होणार आहे. आधीच महाराष्ट्रातील सर्व श्रेणींमधील विजेचे दर शेजारी राज्यांपेक्षा जास्त होते. त्यात ही पाच टक्के वाढ भर टाकणार आहे. याचा थेट फटका व्यापार, व्यावसायिक, उद्योग, घरगुती ग्राहक या सगळ्यांनाच बसणार आहे. पर्यायाने ० ते १०० युनिट वापरणाऱ्या लोकांनाही याची झळ बसणारच आहे. वाढत्या महागाईमुळे बील भरण्यासाठीही त्यांच्याकडे काही उरणार नाही. म्हणूनच आमचे धोरण उद्योगस्नेही असल्याचे सांगणाऱ्या सरकारचे हे वागणे न पटणारे आहे.

# क्वांटम कॉम्प्युटिंगची भन्नाट संकल्पना

**तंत्रवेध**

**- डॉ. दीपक शिकारपूर**



आजच्या तंत्रयुगात संगणकप्रणालीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. पारंपरिक संगणक अनेक समस्यांवर कार्यक्षमतेने उपाय शोधतो, परंतु गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी उच्च क्षमता आवश्यक आहे. अशा परिस्थितीत क्वांटम कॉम्प्युटिंग ही एक क्रांतिकारी संकल्पना म्हणून उदयास आली आहे. ही संगणक प्रणाली क्वांटम भौतिकशास्त्रावर आधारित आहे आणि पारंपरिक संगणकांपेक्षा लाखोपट वेगवान आणि कार्यक्षम ठरू शकते.

संगणक म्हणजे काय याबाबतच्या कल्पना सतत बदलत आहेत. तीस वर्षांपूर्वी असलेली मेनफ्रेम संगणकाची क्षमता आता ५जी स्मार्टफोनमध्ये काही वर्षात येईल. अनेक विकसक नवनवीन कल्पना राबवून व्यवसाय, जीवन, व्यापार, उद्योग, सरकारी कामकाज अशा अनेक बाबीत अभिनव प्रोग्रॅम्स/ॲप्स निर्माण करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात आपण वेगाने प्रगती करत आहोत. एके काळी केवळ विज्ञानकथांमध्ये पाहिले जाणारे तंत्रज्ञान आता प्रत्यक्षात येत आहे. आज आपण अशा एका तंत्रयुगात आहोत जिथे संगणक प्रणालीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. पारंपरिक संगणक अनेक समस्यांवर कार्यक्षमतेने उपाय शोधतो, परंतु काही गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी आणखी उच्च क्षमता आवश्यक आहे. अशा परिस्थितीत क्वांटम कॉम्प्युटिंग ही एक क्रांतिकारी संकल्पना म्हणून उदयास आली आहे. ही संगणक प्रणाली क्वांटम भौतिकशास्त्रावर आधारित आहे आणि पारंपरिक संगणकांपेक्षा लाखोपट वेगवान आणि कार्यक्षम ठरू शकते. कालचे सुपर कॉम्प्युटर आता नवीन स्वरूपात येत आहेत. त्याचेच नवीन नाव आहे क्वांटम कॉम्प्युटिंग. हे एक वेगाने उदयाला येणारे तंत्रज्ञान आहे. ते शास्त्रीय संगणकांसाठी अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी क्वांटम मेकॅनिक्सच्या नियमांचा उपयोग करते. ही यंत्रे अर्ध्या शतकाहून अधिक काळ चालत आलेल्या शास्त्रीय संगणकांपेक्षा खूप वेगळी आहेत. क्वांटम संगणकाची संकल्पना सर्व प्रथम १९८२ मध्ये नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्र रिचंड फेयनमॅन यांनी मांडली. ज्याप्रमाणे संगणकाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवले, त्याचप्रमाणे क्वांटम कॉम्प्युटिंग भविष्यात अनेक क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व बदल घडवण्याची क्षमता ठेवते.

हे तंत्रज्ञान केवळ पारंपरिक संगणकांच्या मर्यादा ओलांडून जटिल समस्या सोडवण्यास मदत करेल असे नाही, तर ते संशोधन, विकास आणि नवनवीन शोधांनाही चालना देईल. क्वांटम कॉम्प्युटर क्यूबिट्स वापरतात. क्यूबिट्स क्वांटम यांत्रिकीच्या नियमांवर आधारित असतात आणि त्यांच्यामध्ये सुपरपोझिशन आणि एंटँगलमेंट या दोन महत्त्वाच्या संकल्पना असतात. एंटँगलमेंट म्हणजे दोन किंवा अधिक क्यूबिट्स अशा प्रकारे जोडले जातात की, एका क्यूबिटची स्थिती बदलल्यास दुसऱ्या क्यूबिटची स्थितीही तत्काळ बदलते. यामुळे अत्यंत जटिल समस्या सोडवण्यासाठी प्रचंड समांतर प्रक्रिया करणे शक्य होते. साधे उदाहरण म्हणजे जसे साधा संगणक एका वेळी एक पुस्तक वाचेल आणि मग दुसऱ्या पुस्तकाकडे वळेल, पण क्वांटम कॉँप्युटर एकाच वेळी ग्रंथालयातील सगळी पुस्तके वाचायला घेईल. या क्वांटम नियमांमुळे क्वांटम कॉम्प्युटर पारंपरिक संगणकांना लागणाऱ्या दशके किंवा शतकांच्या तुलनेत काही मिनिटांमध्ये किंवा सेकंदात अत्यंत गुंतागुंतीच्या गणिताच्या समस्या सोडवू शकतात. क्वांटम संगणक प्रणालीमुळे माहितीची देवाणघेवाण, साठवण, माहिती प्रक्रिया सुरक्षिततेत्या करता येईल. यामुळे हॅकिंगसारखे प्रकार रोखता येतील. क्वांटम संगणकाच्या माध्यमातून अतिगुंतागुंतीचे गणिती सिद्धांत साठवले जाऊ शकतील. संगणकीय मॉडेलच्या आधारे वैद्यकिय आजारावरील कारणे शोधता येतील.

क्वांटम कॉम्प्युटिंगची शक्ती वापरणाऱ्या संस्था जगातील काही मोठ्या समस्यांचे निराकरण करण्यात मदत करू शकतात आणि औषध संशोधनापासून जागतिक कृषी, संरक्षण आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करू शकतात. पर्यावरणक्षेत्रात हवामानात होणारे बदल टिपून त्यातील भूतकाळातील नियमांनुसार भविष्यातील निष्कर्ष म्हणजे हवामानाचे अंदाज काढणे महत्वाचे असते. त्यामुळे हे अंदाज जितके बरोबर येतील, तितकी मदत मानवजातीला होईल. चक्रीवादळ, अतिवृष्टी, भूकंप या नैसर्गिक आपत्तीला आपण अस्मानी संकट मानतो. त्यात दर वर्षी प्राणहानी व कोट्यवधी मालमत्तेचे नुकसानही होते. या ठिकाणी भविष्यातील क्वांटम संगणक खूप मदत करू शकतील. संगणकाचे सध्याचे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी, अतिउच्च संगणकीय संसाधने वापरतात. त्यासाठी प्रचंड मोठे विदा (डेटा) विश्लेषण करायची गरज असते. हे प्रकरण प्रचंड वेळखाऊ आणि खर्चिक आहे. क्वांटम कॉम्प्युटरमध्ये सध्याच्या कॉम्प्युटरच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी संगणकीय संसाधनांसह समस्या सोडवण्याची क्षमता आहे. यामुळे अधिक कार्यक्षम कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रोग्रॅम्स तयार होऊ शकतात, या तंत्राचे अनेक क्षेत्रांना दीर्घकालीन फायदे आहेत.

आरोग्यक्षेत्रात हे तंत्रज्ञान औषध शोध, जिनोमिक्स आणि वैयक्तिक आरोग्यसेवांना लक्षणीयरीत्या गती देऊ शकते. उत्पादन क्षेत्रासाठी ते पुरवठा साखळी व्यवस्थापन, खर्च कमी करणे आणि एकूण कार्यक्षमता सुधारणे हे उद्दिष्ट साध्य करू शकते. सध्या अनेक वाहनांवर जीपीएसद्वारे वाहन हालचाल व्यवस्थापन माहिती मिळवली जाते. अनेक सीसीटीव्ही कॅमेरे चलतचित्रे रेकॉर्ड करतात. पण, हे सर्व पाहणे आणि त्यावर निर्णय घेणे मानवाच्या क्षमतेबाहेरचे आहे. इथेच उच्च तंत्रज्ञानक्षम माहिती पृथःकरण महत्वाचे आहे. माहितीचे तत्काळ पृथःकरण हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया आहे. ही माहिती अनेक स्वरूपात असू शकते. उदा. प्रचलित दिशा आणि नकाशा शोधणे आणि त्यावरचे मार्गदर्शन, सॉफ्टवेअरने वाहनाच्या स्थानाचे द्रुतपणे विश्लेषण करणे आणि रिअल टाइम ट्रॅफिक समस्यांवर ड्रायव्हरला त्वरित मार्गदर्शन करणे. तसेच लक्षावधी सीसीटीव्ही कॅमेरे अनंत प्रतिमा साठवतात. त्यांचे त्वरित पृथःकरण करून निष्कर्ष काढण्यासाठी अतिशक्तिशाली संगणक लागतात. इथेच क्वांटम संगणक उपयुक्त ठरतील. माणसांना फक्त अपवादांबद्दलच सांगितले पाहिजे, तरच त्वरित निर्णय घेतले जातील. आपला शेजारी मुख्य स्पर्धक असलेला देश चीन या क्षेत्रात खूप पुढे आहे. आपल्या देशातील वित्त, संरक्षण, जलसाठे, ऊर्जानिर्मिती अशा अनेक क्षेत्रातील माहितीचा गैरवापर टाळण्यासाठी, आपल्याला सायबर सुरक्षेतील प्रतिबंधक प्रणाली विकसित कराव्या लागतील. इथे क्वांटम संगणक उपयोगी ठरतील.

२०२३ मध्ये आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरु झाले. भारत एक नवीन झेप घेण्यासाठी आणि क्वांटम तंत्रज्ञानामध्ये जगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. राष्ट्रीय क्वांटम मिशनची आता निर्मिती करण्यात आली आहे. अशा प्रकारे मिशनच्या स्वरूपात क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी कार्यक्रम जाहीर करणारा भारत हा सातवा देश ठरला आहे. अमेरिका, चीन, कॅनडा, ऑस्ट्रिया, फिनलंड आणि फ्रान्स या देशांनी यापूर्वीच अशा मोहिमा सुरू केल्या आहेत. सुपरकंडक्टिंग आणि फोटोनिक तंत्रांसारख्या विविध प्लॅटफॉर्म्सवर आठ वर्षांमध्ये पन्नास ते एक हजार भौतिक क्यूबिट्स क्षमतेचा, मध्यम क्वांटम संगणक विकसित करणे हे नवीन मिशनचे उद्दिष्ट आहे. २०२३-२४ ते २०३०-३१ या आठ वर्षांच्या कालावधीत क्वांटम मिशनवर सहा हजार ६५ कोटी खर्च केले जातील. देशातील दोन हजार किलोमीटरच्या परिक्षेत्रातील ग्राउंड स्टेशन्समधील उपग्रह आधारित सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, इतर देशांसोबत लांब पल्ल्याचे सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, दोन हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतराचे आंतरशहर क्वांटम नेटवर्क हे मिशनचे इतर पैलू आहेत. हे मिशन आण्विक यंत्रणा आणि अणुघड्याळांमध्ये उच्च संवेदनशीलतेसह सुसज्ज मॅग्नोमीटर विकसित करण्यात मदत करेल. क्वांटम उपकरणे तयार करण्यासाठी सुपरकंडक्टर, नवीन सेमीकंडक्टर आणि टोपोलॉजिकल सामग्रीच्या डिझाइनमध्येदेखील हे मदत करेल. मिशनअंतर्गत क्वांटम कॉम्प्युटिंग, क्वांटम कम्युनिकेशन, क्वांटम सेन्सिंग आणि मेट्रोलॉजी, क्वांटम सामग्री आणि उपकरणे या क्षेत्रात चार केंद्रे स्थापन केली जातील. क्वांटम कॉम्प्युटिंग हे एक असे तंत्रज्ञान आहे, जे आपल्या भविष्याची दिशा बदलू शकते. हे केवळ वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचे प्रतीक नाही, तर मानवाच्या सर्वात मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता असलेले एक शक्तिशाली साधन आहे. औषधनिर्माण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, हवामान बदल आणि सामग्री विज्ञान यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये ते क्रांती घडवून आणेल. सध्या या तंत्रज्ञानासमोर काही आव्हाने असली तरी, संशोधक आणि शास्त्रज्ञ त्यावर मात करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. क्वांटम कॉम्प्युटिंगचे महत्त्व केवळ गती आणि कार्यक्षमतेपुरते मर्यादित नाही, तर ते आपल्याला आजपर्यंत न सुटलेल्या जटिल समस्यांवर उत्तरे शोधण्याची आणि मानवजातीसाठी एक उज्वल भविष्य घडवण्याची संधी देते. येत्या काही दशकांमध्ये क्वांटम कॉम्प्युटिंग आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनेल आणि आपले जग पूर्वीपेक्षा अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि प्रगतशील बनवेल अशी अपेक्षा आहे.

# अमृतवाहिनीच्या ५१ विद्यार्थ्यांची कंपन्यांत वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : अमृतवाहीनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हील इंजिनिअरींग विभागातील ५१ विद्यार्थ्यांची विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. सिव्हील इंजिनिअरींग अंतीम वर्षामधील विद्यार्थांना किर्लोस्कर, न्युमॅटीक, सोपान, ओअँड एम, एस. जे. कॉन्ट्रॅक्टस, इनोव्हिजन इन्फ्रासोल, इंडोव्हन्स, आर. ए. टेक टेकसीस, पीमार एस इंफ्रा, सुरोज बिल्डकॉन, प्लानेज कन्सल्टन आदी नामांकित कंपन्यामध्ये थेट मुलाखतीद्वारे निवड झाली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी दिली.

प्राचार्य डॉ. व्यंकटेश म्हणाले की, महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट वृद्धीसाठी सॉफ्ट स्कील ट्रेनिंग, इंडस्ट्री व्हिजीट, वेगवेगळ्या नवनवीन विषयांवर कार्यशाळा, इंटर्नशीप प्रोग्राम, जपान व जर्मनी भाषांचे प्रशिक्षण असे विविधपूर्ण उपक्रम राबवले जात आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त तथा मा. आ. डॉ. सुधीर तांबे, व्यवस्थापकीय विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, सिव्हील इंजिनिअरींग विभाग प्रमुख डॉ. एस. बी. कांडेकर यांनी अभिनंदन केले.

याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे सोफ्टवेअर प्रशिक्षण, गेट ट्युटर, ऑटोकॅड,रेव्हीट, आर्किटेक्चर, एस. डी. एस आणि टेक्लास्ट्रक्चर ट्रेनिंगसारखे उपक्रम राबवले जात आहेत. यासाठी करिअर डेव्हलपमेंट सेलचे प्रा.प्रवीण वाकचौरे,




सिव्हील विभागाचे प्लेसमेंट समन्वयक प्रा. निलेश खैरनार प्रयत्नशील आहेत.

सिव्हील इंजिनिअरींग विभागातील जवळ जवळ २२६ विद्यार्थी शासनाच्या सरळ सेवा तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तर्फे सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण, पाणी पुरवठा, जलसंपदा, जीवन प्राधिकरण, नगर रचना या विभागासाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमधून निवड होऊन आणि इंडियन इंजिनीअरिंग सर्व्हिसेस या परीक्षांमधून निवड होऊन विविश शासकीय नोकऱ्यांमध्ये कार्यरत आहेत.

आजपर्यंत स्थापत्य विभागातील २३२ विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरु करून यशस्वी नवउद्योजक म्हणून काम करत आहेत. सिव्हील इंजिनिअरींग विभाग शासनाच्या उन्नत भारत, उन्नत महाराष्ट्र अभिमान, जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन इत्यादी योजनांमध्ये सहभागी आहे. नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रेडिटेशन, नवी दिल्ली द्वारे चार वेळा नामांकन मिळालेले आहे.

# हेरंब कुलकर्णींना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांना गिरीश गांधी सामाजिक राष्ट्रीय पुरस्कार वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात डॉ. अभय बंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अभय बंग यांनी हेरंबकडे प्रश्नांने अस्वस्थ होणारे संवेदनशील हृदय, तो प्रश्न मांडणारे प्रभावी लेखन आणि लेखनावर न थांबता उत्तर शोधणारी कृतिशीलता आहे.




पुरस्कारामुळे कार्यकर्ता ज्या विषयावर काम करतो. त्याला समाज मान्यता मिळते. त्यामुळे एकल महिलांचा प्रश्न आज समाजासमोर आला आहे.

हेरंब कुलकर्णी यांनी दारिद्र्याचे प्रश्न समाजापर्यंत पोहोचवणे हेच कठीण झाले असून तरुणांना आणि मध्यमवर्गाला सामाजिक प्रश्नावर संवेदनशील बनवणे हेच आज आव्हान आहे.

# आज भारत बंद; २५ कोटी कर्मचारी संपावर जाणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : आज, ९ जुलै रोजी अनेक राज्यांमध्ये बँका, विमा, पोस्ट, कोळसा खाणकाम, महामार्ग, बांधकाम आणि सरकारी वाहतूक यासारख्या महत्त्वाच्या सेवांवर परिणाम होऊ शकतो. कारण २५ कोटींहून अधिक कर्मचारी देशव्यापी संपावर म्हणजेच भारत बंदवर जाणार आहेत. १० केंद्रीय कामगार संघटना आणि त्यांच्या संलग्न संघटनांनी या संपाची हाक दिली आहे. केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी हा संप पुकारण्यात आला आहे, ज्या धोरणांना संघटना कामगारविरोधी, शेतकरीविरोधी आणि कॉर्पोरेट समर्थक मानतात. संपात २५ कोटींहून अधिक कर्मचारी सहभागी होणार आहेत. यामध्ये बँका, पोस्ट, कोळसा खाणकाम, विमा, वाहतूक, कारखाने आणि बांधकाम अशा अनेक क्षेत्रातील कर्मचारी समाविष्ट आहेत. याशिवाय शेतकरी आणि ग्रामीण मजूरदेखील या निषेधात सामील होतील.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## कामगारांच्या विकासासाठी महायुती शासन कटिबद्ध

याप्रसंगी ते बोलत होते. आ. काळे म्हणाले की, बांधकाम कामगारांचा समाजाच्या विकासात मोलाचा वाटा उचलणाऱ्या बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे योगदान अमूल्य आहे. बांधकाम कामगार म्हणजेच कोपरगाव मतदार संघाचा भक्कम पाया आहे. त्यांच्या कष्टातूनच भव्य-दिव्य इमारती उभ्या राहतात, रस्ते रुंदावतात आणि प्रगती होते. या कामगारांच्या कष्टाचे चीज व्हावे आणि त्यांचा संसाराचा आर्थिक भार कमी होवून त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक साधने व गृहपयोगी वस्तू महायुती शासनाने उपलब्ध करून दिल्या आहेत.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते तसेच बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व बँकांची यादी काढली तर समजेल ९० टक्क्यांच्यावर रिकवरी घेणाऱ्या कोणत्या बँका आहेत तर त्यात रायगड जिल्ह्याचा उल्लेख हा करावा लागतो, सिंधुदुर्गचा करावा लागतो, रत्नागिरीचा करावा लागतो. मी अनेकदा विचार करतो नेमक्या या चार जिल्ह्यातच असं का आहे? याचा अर्थ कोकणी माणसाच्या स्वभावात दिसतो असं मला वाटतं. घेतलेलं कर्ज लवकरात लवकर फेडणे याशिवाय गत्यंतर नाही. हा विचार कोकणी माणसाच्या अंतकरणात रुजलेला आहे.

## गुरुपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर कोल्हेंच्या प्रशासनाला सूचना

रस्त्यांची डागडुजी तातडीने पूर्ण करावी. विशेषतः पावसाळ्यात सिमेंटच्या रस्त्यांवर माती साचल्याने अपघाताचे प्रमाण वाढते आहे, त्यावर त्वरित उपाय करावा, अशी सूचना त्यांनी केली. भाविकांची वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी वाहतूक पोलिसांनी मार्गदर्शन केंद्रांची उभारणी, वाहनांच्या पार्किंगसाठी वेगळी जागा आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा उपलब्ध ठेवण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

## शेअर मार्केटचा नवा फंडा, नागरिकांना लाखोंचा गंडा?

१० ते १२ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून या कंपनीने सुरुवातीला गुंतवणूकदारांना १ लाख रुपये गुंतविल्यास महिना १० ते १२ हजार रुपये देऊन हजारो कोटी रुपये एजंटच्या माध्यमातून गोळा केले. मात्र आता दोन महिन्यांपासून व्याज बंद झाले. तसेच गुंतविलेले पैसेही मिळत नसल्याने गुंतवणूकदार चिंताग्रस्त बनले आहेत. गेल्या दोन वर्षात दामदुप्पट किंवा जादा परताव्याचे आमिष दाखवून तीन प्रमुख कंपन्यांनी आपले कार्यालय थाटले होते. कोट्यवधी रुपये ठेवी गोळा करून मनी मॅक्स कंपनीसह अजून दोन कंपन्यांनी सुपा येथून गाशा गुंडाळल्याने हजारो कोटी रुपयांना चुना लागण्याची शक्यता आहे.

शेअर बाजारात जादा परताव्याचे आमिष दाखवून इन्फिनाइट बिकनफ या ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, श्रीगोंदा पोलिसांनी २ आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी नितीन अंबादास गांगर्डे (रा. मांदळी, ता. कर्जत) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधत शेअर बाजारात सुरक्षित गुंतवणूक व दरमहा ६ ते ८ टक्के परताव्याचे आमिष दाखवले. त्यावर विश्वास ठेवून गांगर्डे यांनी इन्फिनाइट बिकनफ प्लॅटफॉर्मवर टप्प्याटप्प्याने एकूण ७३ लाख ५० हजार रुपये गुंतवले. या गुंतवणुकीवर एप्रिल २०२५ पर्यंत त्यांना एकूण १८ लाख ८० हजार ६५५ रुपयांचा परतावा मिळाल्यामुळे त्यांनी अधिक रक्कम गुंतवली. मात्र मे २०२५ पासून परतावा थांबवण्यात आला. विचारणा केली असता, आरोपींनी तांत्रिक अडचण आहे, वेबसाईटचे अपग्रेडेशन सुरू आहे अशी कारणे देत वेळ मारून नेली.

जून महिन्यापर्यंतही परतावा न मिळाल्यामुळे फसवणुकीचा संशय बळावल्याने गांगर्डे यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार श्रीगोंदा पोलिसांनी तत्काळ तपास करून या आर्थिक फसवणुकीप्रकरणी १२ जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. दरम्यान या तक्रारदारांसारखे अनेक लोकांकडून त्यांनी रक्कम जमा केल्याची चर्चा असून हा घोटाळा करोडोंचा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एका वर्षात पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवून ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स कंपनीने शिर्डीसह अनेक जिल्ह्यांतील शेकडो गुंतवणूकदारांची तब्बल तीनशे कोटींहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला. याप्रकरणी मुख्य सूत्रधार भूपेंद्र राजाराम सावळे पाटील याला अटक झाली. या फसवणुकीत अनेक सामान्य नागरिकांनी आपल्या आयुष्याची पूंजी, काहींनी सेवानिवृत्तीची रक्कम, तर साई संस्थानच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी कर्मचारी सोसायटीतून कर्ज काढून पैसे गुंतवले होते.

अनेकांनी तर खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन यात गुंतवणूक केली होती. येथेही अनेक सामान्य कुटुंबाना कोट्यवधींचा गंडा घालण्यात आला. तर शेवगावमध्येही शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्याचा नावाखाली कोट्यवधी रुपये लाटल्याचे याआधीच उघडकीस आले आहे.

# जनार्दन स्वामी आश्रमात गुरुपौर्णिमेचे आयोजन

## १० जुलै रोजी होणार विविध कार्यक्रम; भाविकांमध्ये उत्साह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव शहराजवळी राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज समाधी स्थान कोपरगाव बेट येथे गुरुवार दिनांक १० जुलै रोजी गुरु पौर्णिमा उत्सव होणार आहे.

सालाबाद प्रमाणे गुरुपौर्णिमा सोहळा श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज समाधी स्थान श्री क्षेत्र बेट कोपरगाव तालुका कोपरगाव या ठिकाणी नासिक येथील स्वामी माधवगिरीजी महाराज व मठाधिपती स्वामी रमेशगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडलेश्वर परमानंदगिरीजी महाराज, महामंडलेश्वर शिवगिरीजी महाराज, स्वामी परसराम गिरी महाराज, विश्वेश्वरानंदगिरीजी महाराज, वासुदेवानंदगिरीजी महाराज, शेषगिरीजी महाराज, निवृत्तीगिरीजी महाराज, दिनेशगिरीजी महाराज, अर्जुनगिरीजी महाराज, सोमेश्वरगिरीजी महाराज, ब्रह्मगिरीजी महाराज या वंदनीय महाराजांच्या उपस्थितीमध्ये १० जुलै रोजी पहाटे ४ ते ५ या कालावधीत बाबाजींच्या समाधीची महापूजा करण्यात येणार आहे. सकाळी ७ ते ८ या कालावधीत सत्संग व प्रवचन सोहळा संपन्न होणार आहे तर ९ ते १० वाजेच्या दरम्यान बाबाजींच्या पादुकांची उत्सव मूर्तीची षोडशोपचार महापूजा होणार असून त्यानंतर १० ते १२ या कालावधीत साधू वृंदांची प्रवचने व दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता परमपूज्य बाबाजींच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर पूजेचे पौरोहित्य त्र्यंबकेश्वर येथील वेद शास्त्री प्रशांत शिखरे तसेच राहता येथील वेद शास्त्री, अनंत शास्त्री लावर, महादेव मंदिराचे पुजारी वेद शास्त्री जयप्रकाश पांडे हे विधीवत पूजन करणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहाण्याचे आवाहन राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज समाधी स्थानाचे मठाधिपती विश्वस्त प.पु. स्वामी रमेशगिरीजी महाराज, अध्यक्ष दत्तात्रय बाळकृष्ण होळकर, उपाध्यक्ष विलास यादवराव कोते पाटील, सचिव अंबादास दादा अंत्रे, त्र्यंबक कृष्णाजी पाटील, रामकृष्ण बंडूजी कोकाटे,अनिल बाप्पासाहेब जाधव, आशुतोष विलासराव पानगव्हाणे, संदीप मोहनराव चव्हाण, अतुल बाबुराव शिंदे,शिवनाथ सुभाषराव शिंदे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन पूर्ण झाले आहे.



### महाप्रसादासाठी असणार ४५ क्विंटलची बुंदी

महाप्रसादामध्ये ४० ते ४५ क्विंटल बुंदी, तर २५ ते २६ क्विंटल भाताची खिचडी, १० पोत्याचा चिवडा सदरचा प्रसाद हा प्लास्टिक पिशवीमधून भक्तांसाठी वितरित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी ६ जिल्ह्यातून ३ लाख गुरुबंधू अपेक्षित आहेत. यासाठी अनेक संस्था सामाजिक संस्था, तहसील कार्यालय, पंचायत समिती नगरपरिषद व दोन्ही साखर कारखाने यांच्या सर्वांची मदत होणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी ४ भक्त निवास मध्ये व बाहेरील प्रांगणात ताडपत्री टाकून शामियाना उभारण्यात येणार आहे तसेच महाप्रसाद वाटपासाठी २५०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

# मेंढवन येथे विज उपकेंद्राचे काम सुरू करा: आमदार खताळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तालुक्यातील मेंढवन येथे १३२ केव्ही वीज उपकेंद्राचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळ अधिवेशनात केली.




मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा केली. तालुक्यातील मेंढवन आणि परिसरातील वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी महाराष्ट्र वीज वितरण कंपनीने स्वतंत्र १३२ केव्ही क्षमतेचे वीज उपकेंद्र उभारणीसाठी नियोजन आराखड्यामध्ये बदल करून सन २०२४-२५ मध्ये समाविष्ट केलेले आहे.

वीज पुरवठा सुरळीत नसल्यामुळे या भागातील जनतेला अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे. या भागातील वीजपुरवठा सुरळीत होत नाही, उद्योग आणि घरगुती वापरासाठी वीज उपलब्ध होत नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. या परिसरात विजेचे उपकेंद्र लवकरात लवकर व्हावे अशी आपण सरकारकडे मागणी करत असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

# लिंबु व्यावसायिकास बेदम मारहाण

## दोन अंगठ्यासह एक लाख ९२ हजार रुपये लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : 'आमच्या गावात लिंबू खरेदी करायचे नाही', असे सांगत सागर बोरुडे, दादा सातपुते व त्यांच्या बरोबर असलेल्या १५ ते १६ जणांनी श्रीगोंद्यातील लिंबु व्यवसायिक अमोल म्हेत्रे यांना लाकडी दाडक्याने मारहाण करून दोन अंगठ्या तसेच खिशातील एक लाख ९२ हजार रु रोख रक्कम काढून घेत लिंबूखरेदी करीता पुन्हा आला तर हात-पाय तोडून टाकण्याची धमकी दिली. बांगर्डे ते खांडगाव रोडवर दि. ५ जुलै रोजी सव्वादहा वाजण्याच्या सुमारास घडली.



याप्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात अमोल सुरेश म्हेत्रे यांच्या फिर्यादीवरून सागर बोरुडे, दाद सातपुते (दोघे रा. घोगरगाव) तसेच इतर १५ अनोळखी इसमांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी हे लिंबू व्यापारी आहेत. नेहमीप्रमाणे ते लिंबू खरेदीसाठी बांगर्डे भागातून जात असताना आरोपी सागर बोरुडे, दादा सातपुते व त्यांच्या सोबत असलेल्या १५ ते १६अनोळखी व्यक्तींनी त्यांना रस्त्यात अडवले व 'तू या गावात लिंबू खरेदी करू नकोस' असे म्हणत त्यांची गचांडी धरली व जबरदस्तीने गाडीतून खाली ओढून शेजारच्या शेतात नेले. तिथे फिर्यादीला लाकडी दांडक्याने मारहाण करण्यात आली. याबाबत पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहेत.

# राहाता बाजार समितीत डाळिंब ३०५ रुपये किलो

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहाता** : राहाता बाजार समितीत सोमवारी डाळिंबाला प्रति किलो ३०५ रुपये भाव मिळाला. बाजार समितीत डाळिंबाच्या ८५०५ क्रेट्सची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला २११ ते ३०५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला १३१ ते २१० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला ६१ ते १३० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ४ ला १० ते ६० रुपये प्रति किलो भाव मिळाला. बाजार समितीत गव्हाच्या ११ क्विंटलची आवक झाली. गव्हाला २५३० ते २६६० रुपये भाव मिळाला, तर सरासरी २५९५ रुपये भाव मिळाला. बाजरीला सरासरी २०३५ रुपये भाव मिळाला. हरभऱ्याला सरासरी ५३८० रुपये भाव मिळाला. ज्वारीला सरासरी २२०० रुपये भाव मिळाला. सिताफळाच्या ६ क्रेट्सची आवक झाली. सीताफळाला प्रतिकिलो सरासरी १०० रुपये भाव मिळाला. ड्रॅगन फ्रूटच्या २६० क्रेट्सची आवक झाली. ड्रॅगन फ्रूटला २५ ते ८५ रुपये तर सरासरी ७० रुपये प्रतिकिलो भाव मिळाला.

# आषाढसरींनी पिकांना मिळाले जीवदान

## शेतकऱ्यांना अद्यापही मोठ्या पावसाची प्रतिक्षा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा तालुक्यात बरसत असलेल्या सरींमुळे पाचेगाव, पुनतगाव, बेलपिंपळगाव, गोणेगाव व इमामपूर परिसरातील गावातील सुमारे हजारो एकर क्षेत्रावरील खरीप पिकांना जीवदान मिळाले असले तरी या गावांमध्ये अजूनही मोठ्या पावसाची प्रतीक्षा शेतकरी करीत आहे.

परिसरात रविवारी संध्याकाळ पासून सोमवार सकाळी नऊ वाजेपर्यंत १२ मिमी पाऊस झाला. सोमवारी देखील दिवसभर अधूनमधून रिमझिम पाऊस परिसरात पडला. रिमझिम पावसामुळे खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली, परंतु अद्यापही बहुतांशी विहिरी व बोअरवेल कोरडेठाक असल्याने मोठ्या पावसाची प्रतीक्षा या भागातील शेतकरी करीत आहे.

रोहिणी नक्षत्र व मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आद्रा नक्षत्रात या भागात थोडफार म्हणजे ६३ मिमी पावसाने हजरी लावली होती. त्यानंतर या परिसरात पावसाने पाठ फिरवली होती, पण पुनर्वसू नक्षत्र मध्ये रिमझिम पावसाने या भागात खरिप पिकांना जीवदान मिळून खरिप हंगामातील पिके आता तरीहाताला लागतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.



### पिकांवर रोगांचा प्रार्दुभाव

पावसाने ओढ दिल्याने पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव देखील मोठ्या प्रमाणावर दिसून आला आहे. कपाशी, मूग, सोयाबीन, तूर व मका या पिकांवर अळी, मावा किडींचा प्रादुर्भाव झाला आहे. पण पावसाने थोडीफार जरी हजेरी लावल्याने खरीप पिकांना जीवदान मिळाल्याने उत्पादनबाबत शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# तोरणे राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या महासचिवपदी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर** : पढेगांव (ता. श्रीरामपूर) येथील विशाल तोरणे यांची नुकतीच नाशिक येथे राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आण्णासाहेब कटारे यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या महासचिव पदी नियुक्ती जाहिर करण्यात आली. जिल्ह्याभरात तोरणे यांच युवकांचे मोठं संघटन असून गोरगरिबांचे प्रश्न सर्व समाजघटकांना बरोबर घेऊन त्यांनी जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी चळवळ उभी केली आहे. या माध्यमातून प्रशासनातील सर्व सामन्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अग्रभागी आहे.

राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचा झंझावात संपूर्ण महाराष्ट्रात जोमाने सुरू आहे. गाव तेथे शाखा निर्माण करून अहिल्यानगर, जिल्ह्यामध्ये पक्ष मजबूत करणार असल्याचे महासचिव विशाल तोरणे यांनी सांगितले.

विशाल तोरणे यांच्या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्हाभरातुन त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# रोग आणि तण नियंत्रण वेळीच करावे

## सुदाम वर्पे; चणेगांव येथे शेतकरी चर्चासत्र संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : शेतकऱ्यांनी पीक उत्पादन तंत्रज्ञान समजून घेत उत्पादन घेण्याची गरज आहे. रोग नियंत्रण आणि तण नियंत्रण त्याचबरोबर गरजेनुसार खतांचा वापर वेळेवर केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते, असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाचे प्रा. सुदाम वर्पे यांनी केले.



लोणी येथील कृषी महाविद्यालय आणि श्री रामेश्वर विद्यालय, चणेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने चणेगाव ता. संगमनेर येथे शेतकरी चर्चासत्रात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, कृषि संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे संचालक मच्छिंद्र पावडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रास बाजीराव खेमनर, बाबासाहेब लोहाळे, शहाजीराजे खेमनर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप महाले, श्री रामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. अनिल लोखंडे, कृषिभूषण विठ्ठल असावा, राजेंद्र खेमनर, हिरामण लोहाळे उपस्थित होते.

प्रा. सुदाम वर्पे यांनी ऊस, मका पिकावरील रोग व कीड नियंत्रण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कीड व रोग नियंत्रणाची गरज, त्या वरील उपाय व फायदे या विषयी त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. कृषि विभागाच्या श्रीमती प्रांजल कवडे यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

मच्छिंद्र पावडे यांनी कृषी महाविद्यालयाच्या माध्यमातून गावोगावी होणारे शेतकरी चर्चासत्र ही शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. पुस्तके ज्ञानाबरोबरच महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध विस्तार कार्यक्रमाच्या माध्यमातून थेट बांधावरती जाऊन महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी हे मार्गदर्शन करत आहेत. यामुळे येणाऱ्या काळात नवीन तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत होईल असे सांगितले.

# कमालपूर बंधाऱ्यावरील पूल पाण्याखाली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : नाशिक पाणलोट क्षेत्रातील प्रत्येक धरणातून गोदावरीत काल दुपारनंतर ४० हजाराहून क्यूसेसहून अधिक पाणी सोडण्यात आल्याने कमालपूर बंधाऱ्यावरील पूल पाण्याखाली गेला आहे.श्रीरामपूर वैजापूर-गंगापूर तालुक्याचे दैनंदिन संपर्क दळणवळण वाहतूकीस सोयीचा समजला जाणाऱ्या कमालपूर बंधाऱ्याचे नुकतेच जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून काँक्रिट मजबुतीकरण करण्यात आले आहे. बंधाऱ्याजवळ शनि देवगाव सप्तक्रोशीत होणाऱ्या सद्गुरू गंगागिरी महाराज १७८ व्या सप्ताहनिमित्ताने बंधाऱ्याचेनुकतेच मजबुतीकरण करण्यात आले आहे. आणि मजबूत कठडे बसवणे बाकी आहे. नाशिक पाणलोट धरण क्षेत्रातून गोदावरीमध्ये काल दुपारनंतर एकूण ४३ हजार क्यूसेस पाणी सोडण्यात आल्याचे समजते. नाशिकपासूनच्या गोदावरीवरील बंधारा मालीकेतील अखेरचा समजल्या जाणाऱ्या कमालपूर बंधाऱ्यावर ३९९०० क्यूसेस पाणी प्रवाह असल्याचे समजते.

### *पूल वाहतुकीस धोकादायक*

*जलसंपदा विभागाने अधिकृत सांगितले. हा प्रवाह रात्रीतून वाढण्याची शक्यता असल्याने बंधारा पाण्याखाली जाण्याची दाट शक्यता आहे. जलसंपदा विभागाने या बंधाऱ्यावर २४ तास सोमनाथ शिरसाट या कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली आहे. दर तासाला या कर्मऱ्याकडून श्रीरामपूर जलसंपदा कार्यालयास रिपोर्ट देण्यात येत आहे.*

# जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीवर हवामान केंद्र

## जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केंद्र सरकारच्या वेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डेटा सिस्टम प्रोजेक्ट प्रकल्प (विंड्स) अंतर्गत राज्य सरकारने प्रत्येक गावात स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर जिल्हा कृषी विभागाकडून योजना राबवली जाणार असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा, तालुकास्तरावर समिती स्थापन करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली.



जिल्ह्यात प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे बसवण्यात आले आहेत. या केंद्रावरून तापमान, पर्जन्यमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा आदी हवामानविषयक घटकांची माहिती प्राप्त होते. नगर जिल्ह्यात १३१ पैकी १२४ मंडळांत स्वयंचलित हवामान केंद्र कार्यान्वित असून, उर्वरित सात ठिकाणचे काम प्रगतिपथावर आहे. या स्वयंचलित हवामान केंद्रातील माहिती सर्वात प्रथम स्कायमेटला दिली जाते. यानंतर कृषी व महसूल विभागाला सादर केली जाते.ग्राम पंचायत स्तरावर राबवण्यात येणाऱ्या योजनेसाठी जिल्हास्तरावरील समितीचे जिल्हाधिकारी अध्यक्ष, जिल्हा कृषी अधीक्षक सदस्य सचिव, सर्व उपविभागीय अधिकारी सदस्य, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर निमंत्रित सदस्य असणार आहेत. तालुकास्तरावरील समितीत तहसीलदार अध्यक्ष, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्यासह इतर निमंत्रित सदस्य असणार आहेत.

### ग्रामपंचायत कर्मचाऱ्यावर केंद्राची जबाबदारी

ग्रामपंचायतीमध्ये नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या स्वयंचलित हवामान केंद्राची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर असणार आहे. या हवामान केंद्राची उभारणी, त्याचे कॅलिब्रेशन, कार्यान्वयन, देखभाल, दुरुस्ती यावेळी संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्याची उपस्थित आवश्यक असणार आहे. तसेच केंद्राची नियमित तपासणी, यंत्रामध्ये बिघाड किंवा नुकसान झाल्यास वेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डेटा सिस्टम पाठवणे बंधनकारक आहे.

स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. याबाबत पुढील आठवड्यात अंमलबजावणी समितीची बैठक होणार आहे. यानंतर ग्रामपंचायतस्तरावर सर्वेक्षण करून जागा निश्चित केली जाईल.

**-सुधाकर बोराळे, जिल्हा कृषी अधीक्षक, अहिल्यानगर**

# उन्नती मुथ्था सी. ए. उत्तीर्ण



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर व बेलापूर येथील जैन समाजातील जेष्ठ मार्गदर्शक प्रकाश कन्हैयालाल मुथ्था व विमला मुथ्था यांची नात व राजेश मुथ्था व सारिका मुथ्था यांची कन्या उन्नती राजेश मुथ्था ही इस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टंट ऑफ इंडीयाच्या वतीने घेण्यात आलेल्या सी. ए. (सनदी लेखापाल) परीक्षेमध्ये उच्च श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाली आहे. उन्नती मुथ्था हिचे शालेय शिक्षण पहिली ते दहावीचे समता स्कुल मध्ये तर अकरावी ते वाणिज्य पदवी पर्यंतचे शिक्षण बी. एम. सी. सी. कॉलेज पुणे येथे झाले. तिला मुथ्था अ‍ॅण्ड लाहोटी सी. ए. कंपनीचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. प्रांजल लांडे यांचेही सहकार्य लाभले. सी. एफ. ए. यु. एस. ए. प्रथम लेवल मध्ये पास झाली. उन्नती ही रत्नेश व वंदना यांची पुतणी व आमिषा हिची बहिण आहे. सी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल भारतीय जैन संघटना सकल जैन समाज, श्रीरामपूर चातुर्मास व दीक्षा समिती श्री स्थानकवासी जैन संघ, श्रीरामपूर व बेलापूर संघाने तिचे अभिनंदन केले. तसेच शैक्षणिक क्षेत्रातही तिचा गौरव होत आहे.

# ड्रग्स, कर्जमाफीच्या प्रश्नांकडे वेधले सरकारचे लक्ष

## पावसाळी अधिवेशनात आ. हेमंत ओगले आक्रमक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राज्याच्या पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीवर बोलताना श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आ. हेमंत ओगले यांनी आक्रमक भूमिका घेत मतदारसंघातील अनेक महत्त्वपूर्ण विषयांना वाचा फोडली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने श्रीरामपूर एम आयडीसीमध्ये सापडलेल्या १४ कोटींच्या ड्रग्सबाबत सखोल चौकशीची मागणी केली.

श्रीरामपूर सारख्या ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग्स बरोबर नशेचे इंजेक्शन वाईटनर

### पिकविम्याची थकीत रक्कम त्वरित वर्ग

पिकविम्याची थकीत रक्कम त्वरित भरण्याबाबत आ. हेमंत ओगले यांनी सभागृहात आवाज उठवताच राज्य सरकारने शासन निर्णय प्रसिद्ध करत सुमारे ३७५ कोटी रुपये वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे.

यांसारख्या अमली पदार्थांची सर्रास विक्री चालू असून मोठ्या प्रमाणावर गांजा देखील तस्करी मतदारसंघात होताना दिसून येत असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशनची संख्या वाढविणे आवश्यक आहे. देवळाली प्रवरा पोलीस स्टेशनसाठी मी पहिल्या दिवसापासून मागणी केलेली आहे. त्या मागणीकडे देखील सकारात्मक भूमिका घ्यावी. संपूर्ण मतदारसंघात महावितरणचे तीन तेरा वाजले असून श्रीरामपूर



येथील २०० के. व्हीचे मंजूर असलेल्या सबस्टेशनचे काम तातडीने चालू करावे. त्यामुळे मतदारसंघातील विजेचा प्रश्न मार्गी लागणार आहे. अनेक शेतकरी बांधवांनी सोलर कृषी पंपांची मागणी करून देखील शेतकऱ्यांना सोलर कृषी पंप मिळत नाहीत.

बोगस बियाणांचा प्रश्न अत्यंत गंभीर असून यामुळे बळीराजा अडचणीत येताना दिसत आहे. याबाबत सरकार कठोर पावले चालणार आहे का? शेतकऱ्यांची कर्जमाफी ही केवळ घोषणाच ठरली असून कृषी विभागाने पीक विम्याचा करोडो रुपयांचा हप्ता देखील आजतागायत भरला नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सरकारने तातडीने पिकविमाचा हप्ता भरावा, अशी मागणी आ. ओगले यांनी केली आहे.

# सोनईत सुजाता स्कूलचे रिंगण ठरले आकर्षक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : विठुराया व आषाढीचे महत्व शाळामधील चिमुकल्यानाही समजावे या उद्देशाने सुजाता इंटरनॅशनल स्कूल सोनई येथे आषाढी एकादशी आनंदात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी केलेला रिंगण सोहळा आकर्षक केल्याने ग्रामस्थांच्या चर्चेचा विषय ठरला.

याप्रसंगी वारकऱ्यांच्या वेशभूषेत दिंडी, रिंगण, अभंग गायन आणि हरिपाठ, भक्ती गीतावर मुलांचे नृत्य व गायन तसेच विविध सांस्कृतिक देखावे आकर्षक होते. शाळेच्या पटांगणात ज्ञानोबा माऊलीच्या गजरात विलोभनीय दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. शाळेचे संस्थापक किरण सोनवणे व प्राचार्य ज्योती सोनवणे यांच्या हस्ते विठुरायाची महाआरती करण्यात आली. रिंगण सोहळ्यात २०० पेक्षा जास्त विद्यार्थी भगवा झेंडा हाती घेऊन सामील होते, तर विद्यार्थिनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झाल्या होत्या. सोहळ्याची सांगता पसायदानाने करण्यात आली. संस्थापक किरण सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दिंडी म्हणजे काय? याचा अनुभव देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन चांडे



यांनी केले. आभार सोमीनाथ तुपे यांनी केले.

# रिमझिम पावसात गुंफला हरिनामाचा गजर

## संग्राम मूकबधिर व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांनी काढली आषाढी दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : आषाढी वारी हा महाराष्ट्राचा सर्वात मोठा सण असून विविध विद्यालयांबरोबर संग्राम मतिबंद व मूकबधिर खेमनर, विकास भालेराव, भाऊसाहेब नरोडे, शैला जाधव, मंगल देशमुख, मनोरमा निकम, निकिता गुंजाळ, प्रवीण थोरात , हर्षदा खैरनार आदी उपस्थित

> माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संग्राम मतिमंद व मूकबधिर विद्यालयाने या विशेष विद्यार्थ्यांसाठी अत्यंत चांगल्या सुविधा दिल्या आहेत. आ. सत्यजित तांबे यांनी या विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणासाठी विशेष योजना राबवली आहे.
>
> **– चांगदेव खेमनर**

विद्यालयातील विशेष विद्यार्थ्यांनी दिंडीमध्ये विठोबा रुक्मिणी संत ज्ञानेश्वर तुकाराम यांची वेशभूषा करून रिमझिम पावसामध्ये आषाढी वारी दिंडीचा आनंद घेतला.

संग्राम मूकबधिर व मतिमंद विद्यालयात मोठ्या उत्साहात आषाढी वारी साजरी केली. यावेळी मुख्याध्यापक चांगदेव होते.

वेल्हाळे परिसरातील मैदानात या मतिमंद व बधिर विद्यार्थ्यांची वारी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. विविध वेशभूषा करून वारकरी मोठ्या आनंदाने रिमझिम पावसामध्ये हरिनामाचा गजर करत होते.

चांगदेव खेमनर म्हणाले की, सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे या



विद्यार्थ्यांमध्येही अनेक कला गुण असून त्या सर्वांना वाव देण्यासाठी या उपक्रमांची आयोजन होत असते. आजची आषाढी वारी ही विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा देणारे असून निसर्ग, साधुसंत आणि त्यांनी दिलेली शिकवण ही प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी या विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

या वारीबद्दल माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्री थोरात यांनी अभिनंदन केले आहे.

# श्री तुळसापुरी महाराज संजीवन समाधी सोहळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील भुतवडा गावचे ग्रामदैवत श्री तुळसापुरी महाराज यांचा संजीवन समाधी उत्सव दरवर्षीप्रमाणेच आषाढी द्वादशीच्या दिवशी ग्राम स्थांकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अनेक वर्षांपूर्वी नाथपंथीय श्री तुळसापुरी महाराज यांनी भुतवडा येथे जीवंत समाधी घेतलेली आहे. दरवर्षी आषाढी द्वादशीच्या दिवशी त्यांचा संजीवन समाधी उत्सव आयोजित करण्यात येतो. या उत्सवाच्या निमित्ताने गावातील सर्व धर्मीय लोकं एकत्र येतात. नोकरी, काम धंद्याच्या निमित्ताने बाहेरगावी असलेले ग्रामस्थ या उत्सवाच्या निमित्ताने आवर्जून येथे उपस्थित असतात.

यावर्षी भारुड सम्राट टीव्ही कलाकार गोविंद गायकवाड यांच्या भारुडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भारुडाच्या कार्यक्रम ातुन उपस्थितांचे मनोरंजन व सामाजिक विषयांवर गोविंद गायकवाड यांनी प्रबोधन केले.

या कार्यक्रमासाठी दरवर्षीप्रमाणेच प्रा. मधुकर राळेभात, कैलास माने, माजी पोलीस निरीक्षक सोमनाथ लोंढे,जिल्हा व सत्र न्यायाधीश सत्यवान डोके, शिवाजी डोके, अॅड. हर्षल डोके उपस्थित होते. भुतवडा व पंचक्रोशीतील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### चोवीस वर्षांपासून न्यायाधीश डोकेंची हजेरी

भुतवडा गावचे भूमिपुत्र जिल्हा न्यायाधीश सत्यवान डोके दरवर्षी न चुकता या संजीवन समाधी उत्सवास आवर्जून उपस्थित असतात. अगोदर शिक्षण घेत असताना तसेच नंतर वकील असताना व न्यायाधीश पदावर गेल्यानंतर गेल्या चोवीस वर्षांपासून अखंडितपणे ते या उत्सवास हजर असतात.

# धार्मिक विधीला फाटा देत लोखंडेंचा आदर्श पायंडा

## स्व. लोखंडेंच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर; गरजवंत कुटुंबाना मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : येथील सामाजिक कार्यकर्ते प्रवीण लोखंडे व आरोग्य सेवक संदीप लोखंडे यांच्या मातोश्री यांना साधारण एक महिन्यापूर्वी देवाज्ञा झाली होती. त्यांच्या मुलांनी कोणताही धार्मिक विधी न करता या विधीला येणाऱ्या खर्चाची रक्कम राहुरी तालुक्यातील गुहा या ठिकाणी राहात असलेल्या गरजू कुटुंबाला मदत केली.

राज्यात अनेक दिवसांपासून वेळोवेळी रक्ताच्या पुरवठ्याची कमतरता भासत आहे. याची जाणीव ठेवून रक्तदान शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात मोठ्या प्रमाणात युवा वर्गासह नागरिकांनी व महिलांनी सहभागी होत प्रतिसाद दिला.




### जवळपास ३१ ब्लड बॅग रक्ताचे संकलन

रक्तदान शिबिरामध्ये कोल्हार येथील युवा उद्योजक तुषार बोऱ्हाडे, यश लोखंडे, अंजली लोखंडे, साक्षी गरुड, नीर लोखंडे, फकीरा लोखंडे, गणेश नवाळे या रक्तदात्यांनी रक्तदान केले.

### जवळपास ३१ ब्लड बॅग रक्ताचे संकलन

शिबिरात जवळपास ६० ते ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान केल्याने एखादाच आयुष्य वाचवु शकते. या संकल्पनेतून येथील प्रवरा मेडिकल ट्रस्ट ब्लड सेंटर लोणी येथील रक्त संकलन अधिकारी तनय कुलकर्णी यांनी येथील तरुण पिढीला रक्तदान करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. यावेळी जवळपास ३१ ब्लड बॅग रक्त संकलन झाले.

याप्रसंगी शिवसेना जिल्हा उपप्रमुख श्याम गोसावी, सुनील बोरुडे तसेच अनेक सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार बांधव उपस्थित होते. तसेच छबुराव पाटेकर, विनोद पाटेकर, किरण पाटेकर, विकी पाटेकर यांनी अन्नदान केले. या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात दिंडी उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वडाळा महादेव येथे आषाढी एकादशीनिमित्त शाळेपासून पायी दिंडी काढण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक माळी डी.एन यांनी पालखीतील विठ्ठल व रखुमाई यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

या दिंडीबरोबरच वृक्षदिंडीचेही आयोजन करण्यात आले. झाडे लावा झाडे जगवा तसेच विठ्ठल विठ्ठल नामघोष करत दिंडी निघाली. झांज पथकाने दिंडीचे नेतृत्व केले.

या दिंडीमध्ये विठ्ठल, रखुमाई यांच्या वेशभूषेत आलेले विद्यार्थी दिंडीचे प्रमुख आकर्षण ठरले. वारकऱ्यांच्या वेशात आलेल्या विद्यार्थ्यांनी फुगडी खेळून आनंद लुटला. गायधने यांनी झाडांचे महत्त्व समजावून सांगितले.

सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेऊन टाळ वाजवत भजने केले. विद्यालयाचे उपशिक्षक लाटे व ज्येष्ठ शिक्षिका निंभोरे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून




सांगितले. प्रसाद म्हणून विद्यार्थ्यांना राजगिऱ्याचे लाडू देण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रज्ञा कसार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब कसार, स्वेजल रसाळ, उषा नाईक, साधना वाघमारे, भास्कर सदगीर, ज्ञानेश्वर केदार, दिपाली बच्छाव, जिजाबाई थोरात, सुहास पांडे, प्रशांत बांडे, संदीप जाधव व भास्कर शिंगटे हे उपस्थित होते.

# प्रवरेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या विद्यापीठ परीक्षेत प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागल्याची माहिती प्राचार्य डॉ. सचिन भोसले यांनी दिली.

या परीक्षेत २० विद्यार्थी विशेष प्रविण्यासह प्रथम श्रेणीत तर उर्वरित सर्व २३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. एम.एड. विभागाचा निकाल ९२ टक्के लागला आहे. बी.एड. परीक्षेत मंदिरा जाधव, रुपाली म्हस्के आणि योगिता पठारे आणि सोनाली मगल या अनुक्रमे प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले असून एम.एडमध्ये खराटे प्रियांका खराटे, धीरजकुमार सिंग, महेश चिंधे हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे यांनी अभिनंदन केले आहे.

# भारत ड्रायव्हिंग स्कूलच्या वाहनाची तोडफोड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : महाराणा प्रताप सोसायटी येथे राहणारे भारत मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक शेख इसाक मास्टर यांच्या मारुती स्विफ्ट डिझायर (एमएच १४ सिके २२५६) या वाहनाची अज्ञातांकडून तोडफोड करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

रविवारी (दि. ७ ) पहाटे १२ ते २ च्या सुमारास हा प्रकार घडला असावा, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेख इसाक मास्टर हे गेल्या १० ते ११ वर्षांपासून महाराणा प्रताप सोसायटीत वास्तव्यास आहेत. त्यांच्या गाडीवर भारत ड्रायव्हिंग स्कूलचा बोर्ड लावलेला होता. त्यांना गाडीच्या बाजूच्या खिडकीची काच मोठ्या दगडाने फोडलेली आढळली. ही तोडफोड जाणीवपूर्वक करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

# अमृतवाहिनीचा १००० कोटी व्यवसायाचा टप्पा पार

## चेअरमन सुधाकर जोशी यांची माहिती; देव कवठेमध्ये बँकेची नूतन शाखा होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेरच्या अर्थ विश्वातील प्रमुख मापदंड असलेल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेने जुन २०२५ अखेर एक हजार कोटी रुपये व्यवसायाचा टप्पा पार केला असुन हा विक्रम केवळ ग्राहकांच्या भागीदारीमुळे शक्य झाला असल्याची माहिती चेअरमन सुधाकर जोशी यांनी दिली.

बँकेच्या व्यवसाय वाढीबद्दल व संगमनेरच्या प्रथम महिला नगराध्यक्षा दुर्गाबाई तांबे यांचा वाढदिवस संग्राम मुकबधीर विद्यालय येथे आषाढी एकादशीच्या दिवशी संपन्न झाला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी डहाणू येथील उद्योजक धीरजभाई ठाकुर होते.

### ११०० कोटींच्या व्यवसायाचे उद्दिष्ट

बँकेकडे जुन अखेर ६०२ कोटी इतक्या ठेवी आहेत. तर एकुण कर्ज वाटप ४०३ कोटी पेक्षा अधिक झाले आहे. तर मार्च २०२६ अखेर ११०० कोटी रुपये व्यवसायाचे उद्दिष्ट ठेवले आहे. हा व्यवसाय करत असताना बँकेने नेट एनपीएचे प्रमाण शून्य टक्के राखण्यामध्ये यश मिळवले आहे. गत अडीच वर्षांत बँक व्यवस्थापन मंडळाने सर्व ग्राहक सभासद आणि कर्मचारी हिताचे अनेक निर्णय घेतले.

याप्रसंगी चेअरमन सुधाकर जोशी म्हणाले की, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली बँक दैदीप्यमान कामगिरी करत आहे. बँकेचे प्रगतीत माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्री थोरात व सर्व सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांचे योगदान आहे.

बँकेत मानव संसाधन, नियोजन आणि विकास, बँकींग ग्रंथालय निर्मिती, संपत्ती नियमन विभाग यांची निर्मिती करण्यात आली. तर आय टी, ऑडीट आणि डिजीटलायझेशन विभागाचे सक्षमीकरण करण्यात आले आहे. नेटवर्कींग व्यवहार करण्यासाठी बँकेने विशेष पुढाकार घेऊन आयएमपीएस, एटीएम, फोन पे,क्यु आर कोड या बाबी ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेवांचा लाभ अनेक ग्राहक घेत असल्याचे दिसून येते. या आर्थिक वर्षामध्ये पुढील महिन्यांमध्ये देव कवठे या ठिकाणी बँकेची नूतन शाखा सुरू करण्यात येणार आहे.

याप्रसंगी वृक्षारोपण करण्यात आले. तर बँकेच्या वतीने मुकबधीर विद्यार्थ्यांचे भोजनासाठी कायमस्वरूपी ३० डायनिंग टेबल व १२० खुर्च्या भेट देण्यात आल्या. या भेट वस्तुमुळे विद्यार्थ्यांना आनंद झाला. आषाढी दिंडी काढून आनंद साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना यावेळी क्रिकेट साहित्य बँकेच्या वतीने देण्यात आले. तर बँकेच्या नवीन वसुली वाहनाचे पुजन मान्यवरांनी केले.

यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन अॅड. नानासाहेब शिंदे, उद्योजक ठाकुर, मुख्याध्यापक दशरथ वरपे यांनी




मनोगते व्यक्त केली. प्रास्तविक संग्रामचे विश्वस्त सचिव डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक शिवनाथ कवडे यांनी मानले. यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराथी, सर्व संचालक, कर्मचारी, संग्रामचे सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# मागच्या वर्षीपेक्षा यंदा जुलैमध्येच धरणे झाली फुल्ल!

## नाशिकसह आहिल्यानगर जिल्ह्यामध्ये सर्वदूर पावसाने लावली हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगांव** : नाशिक जिल्हयातील गंगापूर, – दारणा धरणांच्या पाणलोट – क्षेत्रामध्येचार दिवसापासून पावसाचे प्रमाण चांगले असून घोटी, इगतपुरी भागात जोरदार – पाऊस चालू आहे. मागच्या वर्षीपेक्षा यंदा जुन–जुलैमध्येच धरणे फुल्ल भरून वाहत आहेत. मागच्यापेक्षा चौपट पावसाची नोंद झाली आहे.

कोपरगांवच्या गोदावरी नदीत नांदुर मधमेश्वर सांडव्यातून दुपारी ४३,८८२ क्युसेक्स इतका विसर्ग सोडल्याने गोद–ावरी नदीस पुराचे स्वरुप आले आहे. तालुक्यातील गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून आपत्ती विभागास सज्ज ठेवण्यात आले आहे. पाण्याचा विसर्ग वाढता असल्याने गोदावरी नदीच्या पुराचे पाणी शहरात शिरण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दारणा १३१६० क्युसेक्स, गंगापूर ७३३७ क्युसेक्स इतका विसर्ग सोडण्यात आलेला आहे. दारणा व गंगापूर धरणात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दारणा–गंगापूर धरणे ६२ टक्के भरली आहे.

धरणातील आजचा साठा द.ल.घ. फूटात (कंसात मागील वर्षाचा) दारणा ४९२२ (१६०९), मुकणे ५३८३ (४०७), वाकी २१६५ (५८), भाम २४६४ (४६४), भावली १४३४ (३९४), वालदेवी ११३३ (९९), गंगापूर ३४६९ (१३८५) असा जलसाठा आहे. यावरुन या धरणांच्या पाणलोट



क्षेत्रात जुलै महिन्यात तिप्पट चौपट पाऊस झाला आहे. गोदावरी डावा तट कालवा ५४० तर गोदावरी उजवा तट कालवा ३२५ कुयसेक्सने वाहत आहे.

कोपरगांवात रविवारी एकादशीला संततधार पावसास सुरुवात झाली. सोमवारीदेखील ९ वाजेपर्यंत पाऊस चालूच होता. सोमवारी दिवसभर पावसाची रिपरिप चालू होती, त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. नगर–मनमाड रस्त्यावर जुनी गंगा या ठिकाणी रस्त्यावर चिखल निर्माण झाल्याने अनेकांची घसरगुंडी होवून २० ते २५ जण जखमी झाले आहेत. दारणा पाणी पातळी ५७१.५० मीटर, गंगापूर ६३१२.३५ तर नांदुर मधमेश्वर ५३३.५२ मीटर आहे. तालुक्यात पावसाचे प्रमाण चांगले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या पूर्ण होतील, असे चित्र आहे. मात्र दमदार पावसाची अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

### पावसाची आकडेवारी

गेल्या २४ तासात झालेला पाऊस असा मि.मि.मध्ये (कंसात एकूण पाऊस) दारणा ८६ (८०४), मुकणे ७० (८५७), वाकी ११९ (१२४६), भाम ११० (१२४६), भावली १४८ (१७७६), वालदेवी ५१ (४१७), गंगापूर ३६ (५७६), कश्यपी ३२ (६४९), मधमेश्वर १७ (१६५), नाशिक ५५ (५१४), घोटी १२० (१२५२), इगतपूरी १७३ (१७५१), त्र्यंबक १२७ (१२३०), देवगाव ३२ (२३८), ब्राम्हणगाव १५ (११५), कोपरगांव २३ (१५४), पढेगाव ० (९२), सोमठाणा १३ (८८), कोळगाव १८ (१२५), सोनेवाडी २० (९९), शिर्डी १८ (९९), राहाता ६ (८५), रांजणगाव ० (६८), चितळी ० (६०), गोदावरी उजवा कालवा १८९४ तर गोदावरी डावा कालवा १२६० क्युसेक्सने वाहत आहे.

# संजीवनी अकॅडमीचा राष्ट्रीय एमएलबी स्पर्धेत विजय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगांव** : दरवर्षी भारतामध्ये अमेरिकेच्या वतीने मेजर लीग बेसबॉल (एम एलबी) ही स्पर्धा घेण्यात येते. भारतातील अनेक राज्य/प्रदेश या स्पर्धेत सहभाग नोंदवितात. या वर्षी संजीवनी अकॅडमी, कोपरगांव व संजीवनी इंटरनॅशल स्कूल, शिर्डीच्या १३ वर्षे वयोगटांतर्गत खेळाडूंनी अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करत बेंगळूर येथिल द्रविड पदुकोन एक्सलंस सेंटर येथे झालेल्या एमएलबी इंडिया कप २०२५ च्या राष्ट्रीय स्पर्धेत विजेते पद पटकावून संजीवनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर असल्याचे सिध्द केले, अशी माहिती संजीवनी स्कूल्सच्यावतीने



संयुक्तिक पत्रकाद्वारे दिली आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेत एकुण १५० हून अधिक संघांनी सहभाग नोंदविला. शेवटी चार संघ अंतिम फेरीत पोहचले. या चार संघातून संजीवनीच्या खेळाडूंनी अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करत अंतिम विजेते पद जिंकुन देशात एम एलबी मध्ये अव्वल असल्याची मोहर उमटवली. यात पार्थ भाऊराव गांगुर्डे, श्रीजय निखिल बोरावके, अद्वैत अच्युत फोपसे, अर्जुन विजय वडांगळे, शाश्वत समरेंद्र कुमार, विराट अनिल पवार, संजयकुमार सरोज नाईक, गिरीराज संदीप गाडे, विराट अभय देशमुख, वीरल जयप्रकाश करवा, आराध्या योगेश परजणे, श्लोक सचिन जाधव या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

संजीवनीच्या या राष्ट्रीय यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे, स्कुलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक श्री विरूपक्ष रेड्डी व मुस्तकीम पिरजादे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. मनाली कोल्हे यांनी संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या सहभागी खेळाडूंचा सत्कार केला. यावेळी प्रिन्सिपल डायरेक्टर सुधा सुब्रमण्यम, प्राचार्या रीना रजपुत, हेडमिस्ट्रेस रेखा साळूंके उपस्थित होते.

# आषाढीनिमित्त सीताराम गडावर भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : देवशयनी आषाढी यात्रेनिमित्त जामखेड तालुक्यातील खर्डा येथील श्रीक्षेत्र सीताराम गड व धाकटी पंढरी धनेगाव येथील विठ्ठल– रुक्मिणी मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

समाजसेवक प्रा. सचिन गायवळ यांनी भाविकांसाठी खर्डा ते धनेगाव व नान्नज ते धनेगाव येथील धाकटी पंढरी समजल्या जाणाऱ्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी सहा वाहनांची मोफत व्यवस्था केली होती. या मोफत बससेवेचा शुभारंभ प्रा. सचिन गायवळ व खडर्याच्या सरपंच संजीवनीताई पाटील यांच्या हस्ते झाला. यावर्षी प्रचंड संख्येने या मोफत बससेवेचा भाविकांनी लाभ घेतला.ॲड. अरुण जाधव यांच्या नेतृत्वाखाली खर्डा ते धनेगाव संविधान समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. समता दिंडीच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांनी प्रतिसाद देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने दिलेले अधिकर समाजातील तळागाळात पोहोचविण्याचे काम समता वारकरी दिंडीच्या माध्यमातून केले जात आहे. त्या माध्यमातून समाजात एक वेगळाच संदेश देण्याचा प्रयत्न ॲड. अरुण जाधव हे करीत असतात. या दिंडीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेचा सन्मान करून या दिंडीच्या माध्यमातून प्रबोधन करण्याचे काम केले जात आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर आबा राळेभात यांचा दिंडी सोहळा जामखेड मार्गे धनेगाव येथे असंख्य भाविक भक्तांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येत आहे. त्या दिंडीलासुद्धा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून आले.

# ग्रो–मोर कंपनीने दाखविले आमिष

## तब्बल २१ गुंतवणूकधारकांची पोलिसांकडे धाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : साई संस्थान कर्मचारी व काही स्थानिकांना एकाने 'ग्रो– मोर' कंपनीत भरघोस व्याजासह इतर आमिष दाखवून गुंतवणूक




करण्यास भाग पाडले. या संदर्भात नवराष्ट्रने वृत्ताच्या माध्यमातून लक्ष वेधले होते. आता या संदर्भात २१ गुंतवणूकधारकांनी पोलिसांकडे तक्रार केली आहे.

भूपेंद्र सावळे याने आमची कंपनी आपले पैसे शेयर्स मार्केटमध्ये गुंतवत असून, आपले पैसे सुरक्षित असल्याचे सांगत अनेकांचा भरघोस व्याज, महागडे गिफ्टचे आमिष दाखवत विश्वास संपादन केला. त्यांना ब्लॅक चेकही दिले. काहींना व्याज, मूळ रक्कम परत मिळाल्याने पुन्हा लाखो रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. यामध्ये साई संस्थानचे अनेक अधिकारी, कर्मचारी, शिर्डीतील व्यापाऱ्यांसह सामान्य नागरिकांचा समावेश आहे. गुंतवणुकीचा आकडा मोठा असल्याचे सांगितले जाते. काही दिवसानंतर मूळ रकमेसह व्याजही मिळत नसल्याने आपली फसवणूक झाल्याची जाणीव अनेकांना झाली. मात्र भूपेंद्र सावळे सोशल मीडियाद्वारे प्रत्येकाचे पैसे परत मिळतील, असे आश्वासन दिले होते.आता शिर्डी पोलिस स्टेशनमध्ये अनिल रामकृष्ण आहेर यांनी भूपेंद्र राजाराम सावळे, राजाराम भटू सावळे, सुबोध सुकदेव पाटील उर्फ सावळे, संदीप भास्क सावळे, भाऊसाहेब आनंदराव थोरात (सर्व रा. शिर्डी), अरूण रामदास नंदन, पूजा गोकुळ पोटिंडे (रा. नाशिक) याच्या विरोधात फिर्याद दिली आहे. यात एक कोटी ६५ हजारांची फसवणूक झाल्याचे म्हटले आहे. तसेच फसवणूक झालेल्या २१ गुंतवणूकदारांची यादीही सोबत दिली आहे.

# वारी पंढरीची ज्ञानगंगा 'अशोक' ची दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : अशोक सहकारी साखर कारखाना संचलित माजी आ.भानुदास मुरकुटे यांच्या संकल्पनेतून व अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोक इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स आर्ट्स अँड कॉमर्स प्रगतीनगर येथे आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली. प्रारंभी विठ्ठल रुक्मिणी मूर्तीचे पूजन प्राचार्य संपत देसाई यांच्या हस्ते संपन्न होऊन आरती करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य व रिंगण नृत्य सादर केले. विठ्ठल नामाचा गजर करत मोठ्या भक्ती भावाने पालखी काढण्यात आली. प्रती पंढरपूरची उबेहूब दिंडी अशोकनगर फाटा येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर बोर्डे आश्रम येथे काढण्यात आली. याठिकाणी आरती होऊन विद्यार्थ्यांनी लेझीम व रिंगण नृत्य सादर केले. याप्रसंगी आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी भाषणे केली. शेवटी प्राचार्य श्री.देसाई यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन कौतुक केले व विद्यार्थ्यांना उपवासाचे लाडू वाटप केले. शेवटी प्रा.मोना हिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नागरिकांच्या सूचना व अभिप्रायासाठी आज बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : 'विकसित महाराष्ट्र २०४७' या विशेष उपक्रमांतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाचे भविष्यातील सुधारित व सुलभ धोरण आखले जात आहे. या संदर्भात नागरिकांच्या सूचना व अभिप्राय मिळवण्यासाठी दि. ९ जुलै रोजी दुपारी ३ वाजता जिल्हा माहिती कार्यालय, आकाशवाणी केंद्रासमोर, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, अहिल्यानगर येथे बैठक आयोजित केली आहे. नागरिकांनी उपस्थित राहून आपले अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी केले आहे.

भारत सरकारने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्याचे राज्याचे ध्येय आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक क्षेत्राचा अर्थव्यवस्थेवर ठसा उमटावा यासाठी 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन जाहिर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या १५० दिवसांच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमात 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्यात येईल. त्यात दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशा टप्प्यांनुसार उद्दिष्टे निश्चित करण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. त्यानुसार शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाचे सुधारित व सुलभ धोरण ठरवले जात आहे.

# रासायनिक खतांचा साठा कळणार ऑनलाईन

## कृषी विभागाची माहिती; शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जिल्ह्यातील रासायनिक खतांची माहिती आता कृषी विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलवर शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात तालुकानिहाय प्रत्येक कृषी केंद्रात शिल्लक असणाऱ्या विविध रासायनिक खतांची माहिती उपलब्ध राहणार आहे. या माहितीच्या आधारे शेतकऱ्यांनी संबंधित कृषी केंद्रशालकाकडे खतांची मागणी करावी, तसेच खतांचा काळाबाजार अथवा लिंकिंग सुरू असल्यास तात्काळ कृषी



विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी वतीने करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामासाठी उपलब्ध झालेल्या विविध रासायनिक खतांचा साठा याबाबतची माहिती कृषी विभागाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या ब्लॉग स्पॉटवर उपलब्ध राहणार आहे. जिल्ह्यात गंभीर दाखल खतांचा काळाबाजार व लिंकिंग रोखण्यासाठी करण्यात येत असल्याचे उपाययोजनांची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली. जिल्ह्यात खरीप हंगामासाठी युरिया, एमओपी, एसएसपी, डीएपी, संयुक्त खते यांचा दोन लाख २४ हजार १४६ मीटर खताची आवंटन मंजूर करण्यात आले होते.

यापैकी एक लाख ४६ हजार ७८० मीटर खतांचा पुरवठा झालेला असून यातील ७३ हजार १६३ खतांची विक्री झालेली आहे. तर कृषी केंद्रचालकांकडे ९७ हजार १५५ मेट्रीक टन खातांचा साठा शिल्लक असल्याचे कृषी विभागाच्यावतीने देण्यात आलेल्या आकडेवारीवरून दिसून आले.

जिल्ह्यात खतांचा कुत्रिम तुटवडा निर्माण होवू नयेत, सर्वसामान्य शेतकऱ्यांना आपल्या गावात असणाऱ्या कृषी केंद्रातील खतांची उपलब्ध कळावी, यासाठी कृषी विभागाच्यावतीने ब्लॉग स्पॉट तयार करण्यात आला आहे.

### ४ लाख मेट्रीक टन खतांचा स्टॉक

दरम्यान, जिल्ह्यासाठी चार लाख मेट्रीक टन खातांचा बफर स्टॉक करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मोबाईलवरून देखील लॉगींग केल्यावर जिल्हा आणि तालुका निवडून त्या ठिकाणी असणाऱ्या कोणत्या कृषी केंद्रात दररोज उपलब्ध असणाऱ्या विविध कंपनीच्या खतांच्या गोणी यांची उपलब्धता शेतकऱ्यांना कळणार आहे.

# लाख येथे घरफोडी; दीड तोळ्याचे गंठण लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील लाख गावात एका घरातून दिवसाढवळ्या चोरीची घटना घडली आहे. येथील सुनील बापूसाहेब निमसे यांच्या घरी भरदिवसा ही धाडसी चोरी असून या घटनेत दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण आणि २५ हजार रुपये रोख रक्कम असा ऐवज चोरीला गेला आहे.

याबाबत सुनील बापूसाहेब निमसे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, त्यांच्या आई प्रमिला यांनी अंदाजे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण भांड्यांच्या मांडणीतील जेवणाच्या दोन ताळी स्टीलच्या डब्यांपैकी वरच्या डब्यात ठेवले होते.

तसेच खालच्या डब्यात कामगारांना पगार देण्यासाठी २५ हजार रुपये ठेवले होते. ५ जुलैला सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सुनील निमसे घर बंद न करताच



श्रीरामपूरला गेले होते.

श्रीरामपूरहून परत येत असताना त्यांना बेलापूरमधील त्यांच्या गावातील पोलीस पाटील महेश आनंदे यांचा फोन आला की, त्यांच्या घरी चोरी झाली आहे आणि त्यांनी ताबडतोब घरी येण्यास सांगितले.

घरी परतल्यानंतर सुनील निमसे यांनी आईकडे विचारणा केली असता, प्रमिला यांनी सांगितले की, ४ जुलैला सकाळी साडेनऊच्या सुमारास त्यांनी त्यांच्याकडील टोळीतील कामाचा

पगार करण्यासाठी २५ हजार रुपये ठेवले होते. ५ जुलैला सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास एक इसम पैसे घेण्यासाठी निमसे यांच्या घरी आला होता. त्यावेळी प्रमिला निमसे यांनी मांडणीवर ठेवलेल्या डब्यातून पैसे देण्यासाठी पाहिले असता, त्या डब्यात पैसे नव्हते. त्यांनी त्या डब्याच्या खालचा डबा उघडून पाहिला असता, त्यातील त्यांचे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठणही तिथे नव्हते. यावरून त्यांची खात्री झाली की, अज्ञात भामट्याने सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली आहे. फिर्यादीवरून राहुरी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**जाहीर प्रगटन**

समस्त गावकरी राशिन ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री. काळे रुपचंद भागुजी रा. राशिन ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांनी त्यांच्या नामे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

सदरील व्यक्तीचा जन्म राशिन ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि.०१/०६/१९६० रोजी झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी दि.२२.०५.२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

Signed by
Guru Tammaray Birajdar
Date: 07-07-2025 18:29:34
(गुरु बिराजदार)
तहसिलदार कर्जत

नेमलेली तारीख १४/०८/२०२५
जिल्हा न्यायालय–१ राहाता.

ॲड पी. के. मोढवे
नि. ७

**जाहीर नोटीस**

किरकोळ दिवाणी अर्ज नं. १२/२०२५

**अर्जदार** – शोभा विष्णु मोरे, रा. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहमदनगर

**सामनेवाले – कोणीही नाही.**

ज्याअर्थी अर्जदार शोभा विष्णु मोरे, रा. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहमदनगर यांनी गार्डीयन ॲक्ट वॉर्डस १८९० सेक्शान ७ व दि मेंटल हेल्थ केअर ॲक्टचे २०१७ चे सेक्शन १४ अन्वये अस्पष्ट मनःस्थितीच्या मुलांसाठी पालक नियुक्तीसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तुम्हाला या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांची दोन मुले १. सचिन विष्णु मोरे व २. सुधिर विष्णु मोरे, दो.रा. कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहमदनगर यांचे नैसर्गीक न्यायाने पालक म्हणुन अर्जदाराची नियुक्ती करणेत यावे व तसे प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दिला आहे. तरी तुम्हाला जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दिनांक १४/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात आपले म्हणणे, हरकतीबाबत आपण स्वतः अगर आपले वकीलामार्फत सदर अर्जामध्ये हजर होवून आपले म्हणणे द्यावे व आपला सविस्तर पत्ता द्यावा. आपण सदर तारखेस कोर्टात हजर न राहिल्यास प्रस्तुतचे प्रकरणामध्ये योग्य तो आदेश परित करण्यात येईल.

आज दि. ०२/०७/२०२५ रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली आहे.

तयार करणार
(ए.एस. जगताप)
क. लिपीक
जिल्हा व अति. सत्र न्यायालय,
राहाता, जि. अहमदनगर

शिक्का

हुकूमावरून,
अधिक्षक,
जिल्हा व अति. सत्र न्यायालय
राहाता, जि. अहमदनगर

# भक्तिमार्ग

# मनाचं समाधान...



आयुष्यात येणारे प्रसंग आपल्याला बरंच काही शिकवून जातात. प्रसंग आपल्या आयुष्यात घडलेले असोत वा इतरांच्या, त्यातून काही ना काही बोध घ्यावाच लागतो. एका आप्ताच्या चटका लावणाऱ्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांनी दाखवलेल्या धीरोदात्त वृत्तीतून हेच शिकता आलं. ओळखीतल्या एका बाईंचा तरूण मुलगा अपघातात गेला. त्या घरावर मोठी आपत्ती कोसळली. दु:ख तर होतंच पण घरातलं वातावरण सामान्य असावं असा प्रत्येकाचाच प्रयत्न होता. मुलाच्या आईने या प्रसंगात धीराचं दर्शन घडवलं. सत्तरीच्या या बाई हस्तकलेच्या वस्तू तयार करतात. अशा प्रसंगात कुणीही खचून जाईल. पण त्या खचल्या नाहीत. मुलाच्या आठवणी होत्या. पण या आठवणी मनात ठेऊन त्यांनी हस्तकलेच्या वस्तू घडवल्या. गुलाबाची सुंदर फुलं तयार केली. प्लॅस्टीकच्या पिशव्यांपासून छोटी फुलं बनवली. तेराव्या दिवसाच्या विधीनिमित्ताने आलेल्या अनेकांना या वस्तू दाखवल्या. या विधीसाठी जमलेल्या नातेवाईकांनी मुलाच्या आठवणी सांगितल्या. पण घरचं वातावरण अगदी सामान्य होतं. घरी आलेल्या प्रत्येक पाहुण्याची काळजी घेतली गेली. कुणाला काही कमी पडू नये याकडे त्यांनी जातीने लक्ष दिलं. दु:खाचं कोणतंही प्रदर्शन मांडलं नव्हतं. घरात वेगळ्या विषयांच्या गप्पा झाला. अपघातात मृत्यू पावलेला मुलगा खूपच लाघवी. माणसं जोडून ठेवणारा. प्रत्येकाच्या मदतीस हजर असणारा. पाककौशल्यं अंगी असणारा. प्रत्येकाला चांगलंचुंगलं खाऊ घालणारा. त्यामुळे त्याच्या मनाला समाधान वाटेल, असंच वातावरण ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून आला. आत्म्याला मिळणारी शांती म्हणजे तरी दुसरं काय? आपण जे सोडून गेलोय त्याचं अनुकरण इतरांनी करणं, मृताच्या गुणांचं आचरण करणं आणि त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करणं हीच खरी शांती नाही का?

भक्ती मार्ग



# चित्रकूटविषयी...


**रामायण-महाभारतकालीन घटनांची साक्ष देणारी अनेक स्थानं आपल्या देशात आहेत. त्यापैकी एक म्हणजे चित्रकूट. श्रीरामचंद्राने वनवासातला सुरूवातीचा काही काळ या स्थानी घालवला होता. मध्य प्रदेशमधल्या सतना जिल्ह्यातल्या मंदाकिनी नदीच्या किनारी हे स्थान**



याच स्थानी राम आणि भरताची भेट झाली. भरताने रामाच्या पादुका याच स्थानी घेतल्या. चित्रकूट हे अत्यंत निसर्गरम्य स्थान. त्यामुळेच वाल्मिकी ऋषींनी रामाला या ठिकाणी राहण्याचा सल्ला दिला होता. या ठिकाणचा धबधबा ९५ फूट उंचावरून कोसळत असल्याने त्याला अमेरिकेतल्या नायगारा धबधब्याची उपमा देण्यात आली आहे. चित्रकूट परिसरातल्या अनेक ठिकाणी श्रीरामाच्या पाऊलांचे ठसे आजही अस्तित्त्वात आहेत. स्फटिक शिळेवर रामाची पावलं उमटली आहेत. याच ठिकाणी राम आणि भरत यांची भेट झाली. श्रीरामाची पावलं या स्थानी उमटली. चित्रकूटपासून पाच किलोमीटर अंतरावर भरत कूप नावाची विहिर आहे. भरताने रामाच्या राज्याभिषेकासाठी इथून पाणी नेल्याचं बोललं जातं. या ठिकाणी भरताचंही मंदिर आहे. त्याच्याच पुढे असलेल्या रामशय्या नावाच्या ठिकाणी राम-सीतेने एकत्र विश्रांती घेतली होती, असं मानतात. इथल्या चरण पादुका ठिकाणाजवळ एक टेकडी आहे. याला लक्ष्मण टेकडी असं म्हटलं जातं. ही लक्ष्मणाची सर्वात आवडती जागा होती. इथे बसून लक्ष्मण पहारा देत असे. इथल्या संकर्षण पर्वतावर हनुमानाचं मंदिर असून सीतेचं स्वयंपाकघरही आहे. या स्थानाच्या आसपास अनेक पवित्र स्थानं आहे. म्हणूनच चित्रकुटाचा महिमा मोठा आहे.


लक्षवेधी तीर्थक्षेत्रे





# गुण मनुष्याचे...

**महाभारतातल्या उद्योगपर्वात चार गुणांचा उल्लेख करण्यात आला आहे. या गुणांचं पालन करणाऱ्या व्यक्तीवर परमेश्वर प्रसन्न होतो आणि त्याची कृपादृष्टी राहते असं म्हटलं जातं. कोणते आहेत हे गुण?**



सत्य आणि धर्म हे अत्यंत महत्त्वाचे गुण मानले जातात. धर्माने वागणारा आणि सत्यवादी धर्मराजा म्हणजे युधिष्ठिर श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय होता. आयुष्यातल्या प्रत्येक प्रसंगात युधिष्ठिराने धर्माचं पालन केलं. दु:ख भोगावं लागलं तरी त्याने धर्माची साथ कधीही सोडली नाही. त्यामुळे श्रीकृष्ण कायम त्याच्या सोबत राहिला. कायम सत्य बोलणाऱ्या आणि धर्माचं पालन करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी परमेश्वर ठामपणे उभा राहतो हे लक्षात ठेवावं.

✲ लज्जा हा तिसरा गुणधर्म. श्रीकृष्णाने १६,००० स्त्रियांशी विवाह केला होता. नरकासूर राक्षसाने या १६,००० राजकन्यांचं अपहरण केलं होतं. श्रीकृष्णाने त्यांची सुटका केली. सुटकेनंतर या राजकन्यांच्या चेहऱ्यावर जाणवणारी लज्जा आणि आपल्याप्रती असलेली समर्पण वृत्ती जाणून श्रीकृष्णाने त्यांच्याशी विवाह केला होता. परमेश्वराप्रती समर्पित वृत्ती आणि लज्जेचा भाव असणाऱ्या भक्तावर भगवंत प्रसन्न होतो.

✲ साधेपणा हा चौथा गुण. सुदामा हा श्रीकृष्णाचा प्रिय मित्र. सुदामाचा साधेपणा कृष्णाला भावायचा. निर्मळ मनाचा, साधेपणा जपणारा मनुष्य परमेश्वराला भावतो.

धर्मग्रंथातून



# कशा असाव्यात देवघरातल्या मूर्ती?

**देवघर कसं असावं, कोणत्या दिशेला असावं, देवघरातल्या मूर्तींचा आकार कसा असावा याबाबत अनेक समज-गैरसमज आहेत. फारशी माहिती नसल्याने चुकीच्या मूर्ती देवघरात ठेऊन आपण नकारात्मक ऊर्जेला आकर्षित करतो. देवाच्या उभ्या मूर्ती देवघरात असू नयेत. याबाबतच्या कारणांविषयी..**



देवघरात स्थापन केलेल्या देवाच्या मूर्तींमुळे घरात सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.

✲ हिंदूधर्मीयांचे ३३ कोटी देव आहेत. प्रत्येक देवाची रूपे वेगळी, अवतार वेगळे. प्रत्येक देवाच्या मूर्ती विविध पद्धतीने घडवल्या जातात. काही मूर्ती उभ्या असतात तर काही बसलेल्या. काहींना चार भुजा असतात तर काही अष्टभुजा आणि दशभुजाही असतात. काही मूर्ती आडव्या झोपलेल्या असतात.

✲ ठराविक स्थितीतल्या मूर्ती घरात ठेवल्याने आपल्या तसंच कुटुंबातल्या सदस्यांच्या आयुष्यात अडचणी येण्याची शक्यता असते.

✲ शास्त्रानुसार गणपती आणि देवी लक्ष्मीच्या उभ्या मूर्ती घरात असू नयेत. या देवतांच्या उभ्या मूर्तींमुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते, असं मानलं जातं.

✲ हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांनुसार या दोन्ही मूर्ती बसलेल्या स्थितीत असाव्यात. या दोन मूर्तींमध्ये १० इंचांपेक्षा जास्त अंतर नसावं.

✲ देवघरात बाळकृष्ण ठेवावा. कृष्णाची बासरी वाजवणारी उभी मूर्ती देवघरात ठेऊ नये.

✲ मृत व्यक्तींच्या तसबिरी देवघरात ठेऊ नयेत.

✲ देवघराला कधीही कुलूप लावू नये.

✲ देवघर नेहमी स्वच्छ ठेवावं.

जाणून घ्या

# नका सोडू धैर्य!



**आयुष्यात चढ-उतार येत राहतात. अडचणीच्या काळात खचून जाता कामा नये. धीर एकवटून प्रत्येक गोष्टीचा सामना करायला हवा. आयुष्यात धैर्याला प्रचंड महत्त्व आहे. आयुष्यातल्या कोणत्या प्रसंगांचा सामना धीराने करायला हवा?**

प्रत्येक व्यक्तीसाठी आपला मान-सन्मान महत्वाचा असतो. आयुष्यात अपमानीत होण्याचे काही प्रसंग येतात. ज्येष्ठ व्यक्तीचं बोलणं माणूस सहन करतो पण लहानांनी केलेला अपमान सहन होत नाही. रागाच्या भरात माणूस चुकीचं पाऊल उचलतो. मात्र अशा प्रसंगी धैर्य आणि मानसिक संतुलन ढळू देता कामा नये. प्रसंग नीट हाताळता आलं पाहिजे. समोरचा रागात असताना आपण शांत राहणं गरजेचं आहे.

✲ सहचरासोबत आपलं अनोखं नातं असतं. विश्वासाने हे नातं बळकट होत असतं. पण अविश्वासाचे प्रसंगही येतात. अशा परिस्थितीत धीर सोडता कामा नये. आपलं नातं टिकवून ठेवण्यासाठी प्रसंगी नमतं घ्यावं लागलं तरी हरकत नाही. स्त्री-पुरूष दोघांनाही हे तत्वं लागू पडतं.

✲ अपयशामुळे माणूस खचतो. वारंवार अपयश येत असेल तर स्वत:वरचा विश्वास उडतो. पण आत्मविश्वास ढळू न देता प्रयत्न करत राहायला हवेत. एक दिवस यश नक्की मिळेल, असा विश्वास मनात असला पाहिजे.

आर्ट ऑफ लिव्हींग




# देव कुठे आहे?

अकबर आणि बिरबलाच्या अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक ईश्वराच्या अस्तित्त्वाविषयी आहे. या कथेतून आपल्याला बराच बोध घेता येईल. देव कुठे राहतो, त्याला कसं प्राप्त करायचं, देव काय करतो असे तीन प्रश्न अकबराने बिरबलाला विचारले. बिरबल या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात गढून गेला. बिरबल चिंतेत असल्याचं दिसताच त्याच्या मुलाने याचं कारण विचारलं. बिरबलाने त्याला प्रश्नांबाबत सांगितलं. दरबारात आपण या प्रश्नांची उत्तरं देऊ, असं बिरबलाच्या मुलाने त्याला सांगितलं. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल मुलाने एक उदाहरण दिलं. दुधात साखर घालून अकबराला ते चाखायला सांगितलं. दुध गोड लागत असल्याचं अकबराने सांगितल्यावर त्यात साखर दिसते का, असा प्रश्न मुलाने विचारला. साखर दुधात विरघळून गेल्याचं अकबराने सांगताच बिरबलाच्या मुलाने ईश्वरही असाच चराचरात विरघळून गेल्याचं सांगितलं. देवाला कसं प्राप्त करायचं या प्रश्नाच्या उत्तरादाखल बिरबलाच्या मुलाने दही आणायला सांगितलं. दह्यात लोणी आहे का, असा प्रश्न त्याने विचारला. यावर दह्यात लोणी आहे पण घुसळल्यानंतरच ते दिसेल, असं उत्तर दिलं. त्याचप्रमाणे ईश्वरही चिंतनानंतरच प्राप्त होतो, असं उत्तर मुलाने दिलं. देव काय करतो, या प्रश्नाच्या उत्तरादाखल मुलाने अकबराला आपला शिष्य बनायला सांगितलं. गुरू उच्च आसनावर बसतो आणि शिष्य खाली बसतो असं सांगितल्यावर अकबर खाली बसला आणि मुलाला आसनावर बसायला दिलं. देव राजाला रंक आणि रंकाचा राजा करतो असं सांगितल्यावर अकबर खूश झाला. देवाच्या अस्तित्त्वाबद्दल अकबराच्या मुलाने दिलेली उत्तरं आजच्या काळातही तितकीच समर्पक आहेत.

भक्तीगाथा



# आर्थिक अडचणी आहेत?




घरातल्या वास्तूदोषांमुळे दैनंदिन जीवनात अनेक अडचणी येतात. आर्थिक अडचणींचा संबंध घरातल्या वास्तूरचनेशी असू शकतो. आर्थिक अडचणींशी संबंधित वास्तूदोषांबाबत जाणून घेऊ या...

✲ वास्तूशास्त्रानुसार उत्तर-पूर्व दिशेने धनाचं आगमन होतं. या दिशेला अवजड सामान किंवा अस्वच्छता असेल तर आर्थिक अडचणी येतात. अशा घरांमध्ये आर्थिक भरभराट धीम्या गतीने होते.

✲ उत्तर-पश्चिम दिशा बंदिस्त असणं वास्तूशास्त्रानुसार अशुभ मानलं जातं. या दिशेला अंध:कार असेल तर घरात वादविवाद होतात आणि आर्थिक अडचणी येतात.


✲ घराचा दरवाजा दक्षिणेकडे असणं अशुभ मानलं जातं. त्यामुळे कपाट किंवा घराचा दरवाजा या दिशेला असू नये.

✲ घराचं स्वयंपाकघर उत्तर-पूर्व दिशेला असेल तर आर्थिक ताळमेळ बसत नाही. स्वयंपाकघर पश्चिम किंवा दक्षिण-पूर्व दिशेला असणं शुभ मानलं जातं.

✲ घरच्या कर्त्या पुरूषाची झोपण्याची खोली दक्षिण-पूर्व दिशेला असू नये. यामुळे घरात अडचणी येतात तसंच कर्त्या पुरूषाच्या आयुष्यात सतत ताणतणाव येत राहतात. कौटुंबिक सुख मिळत नाही.

✲ दक्षिण-पश्चिमेकडे दरवाजे असलेल्या खोल्या घरातल्या इतर खोल्यांपेक्षा मोठ्या असतील तर आर्थिक अडचणी येतात. कायदेविषयक अडचणींचा सामना करावा लागतो. आरोग्यविषय समस्या उद्भवतात.

वास्तू भक्ती



# चीनमधला शंकर



गणपती ही देवता विविध देश आणि संस्कृतींमध्ये वेगवेगळ्या रूपांमध्ये पूजली जाते हे आपण जाणतो. त्याचप्रमाणे भगवान शंकराची चीनमध्ये पूजा केली जात असे. चीनमध्ये आज बौद्धधर्मीयांचं प्रमाण सर्वाधिक असलं तरी प्राचीन काळात इथे शंकराची पूजा केली जात असे. याबाबतचा उल्लेख महाभारतात आढळतो. आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात चाणक्याने चिनी संस्कृतीचा उल्लेख के लाय. इसवी सन पूर्व २२१ मध्ये शिन हुआंग टी नावाच्या व्यक्तीने चिनी साम्राज्याची स्थापना केली होती, असा उल्लेख अर्थशास्त्र ग्रंथात आढळतो. चीनमधल्या क्वानजाउ प्रांतातल्या शिनमेन भागातल्या फुजियान प्रांतात प्राचीन शिवमंदिराचे अवशेष आढळतात. आजसुद्धा येथे पाच फुटांचं शिवलिंग पहायला मिळतं. शंकराच्या मंदिराचे आता भग्नावशेष शिल्लक आहेत. पण इथल्या भिंतींवर वेदिक धर्मविषयक नकाशे आढळतात.

इसवीसन पूर्व १०११ मध्ये हे मंदिर तोडण्यात आलं होतं. पण इसवीसन १४०० मध्ये याची पुनर्स्थापना करण्यात आली. १९५० पर्यंत पुत्रप्राप्तीसाठी चिनी महिला या मंदिरात येऊन शंकराची आराधना करत असत. सहाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत येथे हिंदू मंदिरांचं अस्तित्त्व असल्याचे पुरावे सापडले आहेत. चीनमधल्या सुवांग वू प्रांतात सापडलेल्या खांबावर संस्कृत भाषेतले लेख आढळतात. हिंदू धर्मात मृत्यूची देवता मानल्या गेलेल्या यमाला चीनमध्ये यनमो वांग असं म्हटलं जातं. यामुळे हिंदू आणि चिनी संस्कृतीत बरंच साम्य दिसतं.

धर्म देशोदेशीचे



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✲ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11